# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 32 ) 15th January 2007 ( No : 01


(१)

## अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून होत असलेला विलंब

*महाराष्ट्र विधानपरिषद : शनिवार, दिनांक २३ जुलै, २००५ : दुसरे अधिवेशन, २००५*

**प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे,** वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :-

"एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होणे, अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर करणे, या निवेदनाच्या सोबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिसुद्धा जोडणे, ही पदे अनारक्षित करण्यास होत असलेल्या विलंबामुळे अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाने तसे आदेश दिल्यानंतरसुद्धा इतर अनुषंगिक लाभापासून वंचित ठेवणे, त्यामुळे या अधिव्याख्यात्यांमध्ये निर्माण झालेला तिव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे निवेदन**

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्याबाबत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे दि. ३०.५.२००५ रोजीचे निवेदन प्राप्त करुन घेण्यात आले आहे.

**मा. खंडपीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा सुधारित परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावयाचा असून शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावयाची आहे.** त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दि. ५.१२.९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही. या परिस्थितीत, सुधारित परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्याबाबत विद्यापीठांना कळविले आहे.

अशासकीय महाविद्यालयातील मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली पदे अनारक्षित करण्यासंदर्भात शासनाने निर्गमित कलेल्या वरील नमूद आदेशानुसार आरक्षित पदावर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होण्यासाठी वर्तमानपत्रात ५ वर्षे जाहिरात देणे आवश्यक आहे. त्याचवेळी विविध सेवायोजन कार्यालयाकडून मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करणे जरुरीचे आहे. **तरीही मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्याने सहाव्या वर्षी सदर पद अदलाबदलीने भरण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.** एवढा प्रयत्न करुनही मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदे अनारक्षित करण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडून शासनाकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. **शासनस्तरावर प्रस्तावाची छाननी करुन सामान्य प्रशासन विभागाच्या सल्ल्याने आणि शासनाच्या मान्यतेने पद अनारक्षित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येते.**

पदे अनारक्षित करण्याबाबत नागपूर व अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांचे **विद्यापीठाने पाठविलेले प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यावर उपरोक्त शासन निर्णय दि. ५.१२.९४ नुसार कार्यवाही करता आलेली नाही.**

*****

## अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित न करणे

शासननिर्णयाप्रमाणे पदे अनारक्षित करण्याची कारवाई १०-१० वर्षापेक्षा जास्त काळ पडून रहाते. मा. उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणामध्ये स्पष्टपणे आदेश दिल्यानंतरसुद्धा अनेक वर्षे मंत्रालयातून काहीही कारवाई होत नाही. याविरुद्ध संघटनेच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी शासनाला सादर केलेले निवेदन या बुलेटीनच्या पृष्ठ ०२ वर दिलेले आहे. त्या निवेदनासोबत सहपत्र १ ते ५ म्हणून जोडलेले मा. उच्च न्यायालयानी निरनिराळ्या ५ प्रकरणांमध्ये दिलेले ५ निवाडे पृष्ठ ०३ ते ०७ वर दिलेले आहेत. सभागृहात निरनिराळ्या ६ वेळा यावर प्रश्न उपस्थित झाले. चर्चा घडून आली. ती पृष्ठ १ ते ११ व १३ वर दिलेली आहे. शासनाने अत्यंत चुकीची भूमिका घेतल्यामुळे प्रा.बी.टी.देशमुख विधानपरिषद सदस्य यांनी मा. सभापतींना लिहिलेले ३.१०.२००६ चे पत्र पृष्ठ १२ ते १६ वर प्रसृत केले आहे.

शासनाच्या या चुकीच्या भूमिकेमुळे एका अर्जदाराने दाखल केलेल्या अवमान याचिकेचे लागूपुरते तपशील व त्यावरील मा. उच्च न्यायालयाचे आदेश पृष्ठ ०८ वर दिलेले आहेत. यातून झालेल्या धावपळीपोटी कक्ष अधिकाऱ्यांनी दुरध्वनीवरुन दिलेल्या संदेशाप्रमाणे अमरावती विद्यापीठाने पाठविलेले ५ ऑक्टोबर २००५ चे पत्र पृष्ठ ०९ वर व त्याला धरुन शासनाने काढलेले ४ नोव्हेंबर २००६ चे पत्र पृष्ठ १० वर, त्यानंतर शिक्षण संचालकांनी पाठविलेले दिनांक १७ नोव्हेंबर २००६ चे पत्र पृष्ठ ११ वर प्रसृत केलेले आहे. ४ डिसेंबर २००६ रोजी अमरावती विद्यापीठाने पाठविलेले पत्र पृष्ठ १४ वर दिलेले आहे.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करुन "त्यानुसार सदर पदे खुल्या वर्गातील आहेत **असे दिसते** त्यामुळे ती पदे बिनराखीव करण्याचा **प्रश्नच येत नाही,**" अशी अंदाजदर्शक भविष्यवाणी ४ नोव्हेंबर २००६ च्या शासनाच्या पत्रामध्ये आहे. सहा आठवड्याच्या आत सचिवांनी आपला जबाव दाखल करावा असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांना "या प्रकरणी दाखल झालेल्या अवमान याचिकांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावी." असे आदेश सहसंचालकास या पत्राची प्रत अग्रेषित करुन देण्यात आलेले आहेत. - **संपादक**

(२)

## अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित करण्याची न झालेली कारवाई

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन , २००५*

***शनिवार , दिनांक २३ जुलै २००५***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या शुक्रवार, दिनांक २९ जुलै २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील प्रश्न क्रमांक ५६०३*

**(१) * ५६०३ डॉ. एन. पी. हिराणी , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि.यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरही अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केले हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास, या निवेदनाच्या सोबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रति जोडलेल्या आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षांची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्याबाबत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात **नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे निवेदन प्राप्त करुन घेण्यात आले आहे.**

(२) होय.

(३) मा. उच्च न्यायालयाने संबंधित महाविद्यालयांनी/ विद्यापीठांनी पद अनारक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. **त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने, आरक्षण विषयक धोरणानुसार राखीव पदे बिनराखीव करता येणार नाही असे विद्यापीठाला कळविण्यात आलेले आहे.**

*****

(३)

## अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून होत असलेला विलंब

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन , २००५*

***मंगळवार , दिनांक ६ डिसेंबर २००५***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील प्रश्न क्रमांक ९२९१*

**(७) * ९२९१ श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते**, दिनांक २३ जुलै, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २९ जुलै, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.५६०३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दि. ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षांची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय,

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने संबंधित महाविद्यालयांनी/विद्यापीठांनी पद आरक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत, **त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने फेरप्रस्ताव मागितला आहे.**

*****

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

प्रेषक : **डॉ.ए.जी.सोमवंशी,** सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा)शंकर नगर, अमरावती- ४४४ ६०६

दिनांक ३०.०५.२००५

**प्रति,**

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२

**मार्फत** : मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी पुढील पाच अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत.** (१) मनोहर रंगराव ठाकरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (२) संजय मोतीराम खरबडे, अधिव्याख्याता (संगणक शास्त्र), (३) विनोद लहुराव खळतकर, अधिव्याख्याता (इंग्रजी), (४) विवेक हरीभाऊ हिवरे, अधिव्याख्याता (इंग्रजी), (५) किरण शंकरराव खंडारे, अधिव्याख्याता (इंग्रजी)

महोदय,

मी, सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा), आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, अनुक्रमे (१) मनोहर रंगराव ठाकरे, नेहरु महाविद्यालय, नेर परसोपंत, जि. यवतमाळ (२) संजय मोतीराम खरबडे, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (३) विनोद लहुराव खळतकर, बी.बी.कला, एन.बी. वाणिज्य व बी.पी. विज्ञान महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ (४) विवेक हरिभाऊ हिवरे, श्री. शिवाजी महाविद्यालय, आकोट जि. अकोला (५) किरण शंकरराव खंडारे, डॉ.एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातुर जि. अकोला. येथे उपरोक्त अधिव्याख्यात्यांनी राखीव पदावर सतत पाच भरती वर्षे सेवा केल्यानंतर विद्यापीठाने त्यांना कायम स्वरुपी मान्यता प्रदान केली व त्यानंतर विद्यापीठाद्वारे गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीवरुन त्यांना वरिष्ठ व निवड श्रेणी देण्यात आली. परंतु, लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती यांनी सदर पदे अराखीव न झाल्याचे शासनाचे पत्र नसल्यामुळे त्यांना दिलेल्या वरिष्ठ व निवडश्रेणी अमान्य करुन महाविद्यालयाला रक्कम वसुलीचे आदेश दिले. त्यामुळे त्यांचेवर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मागण्याकरीता त्यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे पाच स्वतंत्र याचिका दाखल केल्या. **सदर याचिकेंवर मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी त्यांची पदे अराखीव करण्याचे आदेश शासनास दिले त्या आदेशाच्या प्रती (Appendix 1 ते 5) अर्जासोबत जोडलेल्या आहे.**

२. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर पदे अराखीव करण्याकरीता विद्यापीठामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. त्या प्रस्तावाच्या पत्राच्या प्रती (Appendix 6 ते 10) अर्जासोबत जोडलेल्या आहेत. सदर पदे अराखीव करण्यासंबंधीचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास पाठवून दोन ते सात महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. तरीही, अद्यापपर्यंत शासनाद्वारे यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

३. महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, अशाच पदावर गो.से. महाविद्यालय, खामगाव, जि. बुलढाणा येथे कार्यरत असलेले तीन अधिव्याख्याते सर्वश्री. सी.एम.जाधव, पी.एस.बोडखे व एम.ओ.वानखडे, यांच्या बाबतीत न्यायालयाचा कोणताही निर्णय नसतांना सुद्धा दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी त्यांना दिल्या गेलेल्या वाढीव वेतन व थकबाकीच्या वसुलीस शासनाने तुर्त स्थगिती दिली व दि. २५ जून २००४ रोजी त्यांना त्या पदाला अनुज्ञेय असलेले सर्व लाभ देण्यात यावे असे आदेश निर्गमित केले. सदर पत्राच्या प्रती Appendix 11 व 12 अर्जासोबत जोडलेले आहेत.

**विनंती** : महोदय, मी आपणास याद्वारे नम्र विनंती करतो की, न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यांचेवर अन्याय होत आहे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची सुद्धा अवहेलना होत आहे. म्हणून आपण सदर पदे अराखीव करण्याचे आदेश देऊन त्यांना न्याय द्यावा. करीता, मी आपले सेवेशी नम्र निवेदन सादर करीत आहे.

आदरपुर्वक सादर,

आपला विश्वासू,

**(डॉ.ए.जी.सोमवंशी)**

सहसचिव, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटना (नुटा)

पत्राची प्रतिलिपी : प्रा.बी.टी.देशमुख, विधानपरिषद सदस्य यांना माहितीकरीता सादर.

(४)

# अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार , दिनांक १८ एप्रिल २००६ : पहिले अधिवेशन , २००६*

(१) * १२७४२ **श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. रमेश निकोसे , श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे :** दिनांक ६ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक ५ डिसेंबर, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ९२९१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अशा अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधीन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) झालेला असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR

## WRIT PETITION NO. 2410 OF 2003

Manohar Rangrao Thakare, aged about 42 years, resident of Shivaji Nagar, Nerparsopant, Dist Yavatmal ....***Petitioner***

***-Versus-***

(1) The State of Maharashtra, through its Secretary, Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) The Director, Higher Education, Maharashtra State, Pune., (3) The Joint Director (Higher Education), Amravati Region, Amravati., (4) The Accounts Officer, Higher Education (Grants), Amravati Region, Amravati., (5) Amravati University, Amravati, through its Registrar, Amravati, (6) The Nehru Arts and Commerce College, Nerparsopant, District Yavatmal, through the Principal, District. Yavatmal.... ***Respondents***

*Mr. Z.A.Haq, Advocate for the petitioner, Assistant Government pleader for respondent nos. 1 to 4, Mr. B.G.Kulkarni, Advocate for respondent no. 5, None appears for respondent no. 6 though served.*

### CORAM : A.P.DESHPANDE AND K.J.ROHEE, JJ

### Dated : 2nd September, 2004

**ORAL JUDGEMENT : (per A.P. Deshpande,J) :** 1.Heard the learned counsel for the parties.

2. The petitioner is working as a lecturer in respondent no. 6 College. The petitioner came to be appointed in the post of Lecturer as on from 1st July, 1988. The petitioner belongs to other Backward Class. The post, wherein the petitioner came to be appointed viz. post of lecturer in subject of English, was advertised in the year 1988 and the same was reserved for scheduled Caste category. As no candidate from the reserve category was available, the petitioner came to be appointed. Since the initial appointment, till date the petitioner continuous to be in service i.e. for about 16 years. After the appointment of the petitioner in the year 1988, it is the case of the petitioner, that respondent no. 6 College, advertised the said post every year for the reserve category but as candidate was not available from that category, the petitioner was continued on year to year basis. The year to year appointment came to be approved by the University. Pursuant to the grant of approval, the petitioner received salary in the post of lecturer.

3. A lecturer, who completes eight years of continuous service from the date of regular appointment, is entitled to senior grade scale. On completion of eight years of service, the petitioner was granted the senior grade scale and the petitioner received salary in the senior grade scale. At a later point of time, an objection was raised by the Accounts Officer, which resulted in stopping the payment of salary in the senior grade scale and steps were in contemplation to recover the excess amount paid to the petitioner. Hence, the petitioner was constrained to file the instant petition. The only objection raised by the Accounts Officer and the Director of Higher Education is to the effect that under the Government Resolution dated 25.1.1990, the state Government has to approve the dereservation of the post, if the post could not be filled in by appointing a reserve category candidate for a period of five years and in case of the petitioner, there is no specific order of dereservation of the post. **No one has disputed the entitlement of the petitioner to be regularised in the post in the sixth year, as provided in the Govt. Resolution dated 25.1.1990. Only for the reason that the State Government has not approved/sanctioned the dereservation of the post, which according to respondent nos. 2 and 4, is a must, the petitioner is facing the problem.**

4. Our attention is invited to a judgment of the Division Bench of this court delivered in Writ petition No. 2101/2000, Coram :A.P.Shah and S.J.Vazifdar, JJ, Dated 1.2.2001. In identical state of facts, the court directed the University to make an appropriate recommendation to the State Government and the State Government was directed to issue orders for dereservation of the post and for regularization of service. **We are persuaded to issue similar directions, by the learned AGP, as in his submission the power to dereserve post vests with the State, we feel ends of justice would be met by issuing similar directions as are issued by the Division Bench in the above referred case.** We are also informed that the University is treating the petitioner as a lecturer regularly appointed in view of the deemed dereservation of the post in sixth year. Be that as it may, we pass the following order:

i) The petition is partly allowed.

ii) We direct respondent no. 6 college to submit a proposal for dereservation of the post from the sixth year to the University and the University is directed to make appropriate recommendation to the State Government, within two weeks from the date of receipt of the proposal from respondent no. 6 college and **the state Government in turn is directed to issue necessary orders in regard to dereservation of the post held by the petitioner and for regularization of the petitioner's services in the sixth respondent college, within a period of eight weeks from the date of receipt of the proposal from the University**

iii) We grant liberty to the petitioner to move the Director of Higher Education- Respondent no. 2 in the matter of grant of senior grade scale, after the state Government passes the appropriate order of dereservation and regularisation of the petitioner. The Director of Higher Education shall consider and decide the said representation, in accordance with law.

iv) Rule is made absolute in the above terms. There shall be no order as to costs.

*****

**Appendix 1 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र एक** होय.

(३) ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय.

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावा व शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावी, **परंतु विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक ५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.**

**श्री. नतिकोद्दीन खतिब** : सभापति महोदय, अधिव्याख्याता के पद अनारक्षित करने के संबंध में उच्च न्यायालय द्वारा निर्णय दिये जाने के बाद भी उस पर अमल नहीं हो रहा है. बुलढाणा जिले के खामगांव तालुका में एक महाविद्यालय में ऐसे तीन पद थें, वहां स्टे दिया गया था लेकिन उसके बाद वे पद रेगूलर किये गए हैं. क्या इसी आधार पर यानी खामगांव की धरती पर और उच्च न्यायालय के आदेश के अनुसार इस तरह के अधिव्याख्याता के पद रेगूलर किए जाएंगे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खामगांव येथील केसचा उल्लेख केलेला आहे. खामगांवचे काय प्रकरण आहे हे मला तपासून पहावे लागेल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, खामगांवच्या प्रश्नांच्यासंदर्भात या प्रकरणात नोटीस दिलेली आहे. Mr. Chairman, Sir, it is not that the hon. Member is asking the question without giving notice. The notice is given. Yes. It is already given. प्रश्न असा आहे की, ३० मे, २००५ रोजीचे नुटाच्या सहसचिवांचे निवेदन मिळाले, १,२,३ ४ परिच्छेदातून या निवेदनामध्ये आरोप केलेले आहेत. निवेदनासोबत कागदपत्रे जोडलेली आहेत. तीन पदे यापूर्वीच अनारक्षित करण्यात आलेली आहे. या निवेदनानुसार पदे अनारक्षित करण्याबाबत मंत्रालयातून स्टे दिलेला होता. त्यानंतर काही पदे अनारक्षित केलेली आहेत, ही पध्दत बरोबर नाही असे मी त्यांना सांगितले. शासनाच्या निर्णयाच्या विरोधात काही लोक हायकोर्टात गेले, हायकोर्टाने निर्णय देऊन सुध्दा मंत्रालयातून पदे अनारक्षित करण्याची कार्यवाही करण्यात येत नाही. हायकोर्टाच्या निर्णयामध्ये १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे ट्रिटमेंट देण्यात यावी असे म्हटले आहे. हायकोर्टाच्या निर्णयात पुढे असेही म्हटलेले आहे की, "...Under the Government Resolution dated 25th January,1990, the State Government has to approve the de-reservation of the post, if the post could not be filled in by appointing a reserve category candidate for a period of five years." परंतु मंत्रालयामध्ये 'जस्टीस' श्री. केंद्रे हे अधिकारी बसलेले आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता १९९४ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. दुर्देवाने प्रश्नाच्या उत्तरात आता "१९९४ च्या शासन निर्णयातील अटी परिपूर्ण नसल्यामुळे हायकोर्टाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही" हा उल्लेख आलेला आहे. यासंदर्भात सुप्रिम कोर्टात शासनाने जाणे हा वेगळा भाग आहे. तसे झालेले नाही त्यामुळे हायकोर्टाच्या निर्णयाची अम्मलबजावणी बंधनकारक आहे. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणाची गांर्भीयाने नोंद घेऊन खामगांवच्या प्रकरणामध्ये मंत्रालयातून आपण जो स्टे दिलेला होता तो उठवून पदे अनारक्षित केलीत. याबाबतीतसुद्धा महाविद्यालय व विद्यापीठाने सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन पदे अनारक्षित केल्याचे आदेश काढले जातील काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, अनेक वेळा वेगवेगळे शासकीय महामंडळे, स्वायत्त संस्था याची जी आरक्षित पदे आहेत ही पदे भरण्याची कार्यवाही आयोग पुरस्कृत निवड समित्यांद्वारे करण्यात येते. उमेदवारांच्या निवडीची विहित प्रक्रिया ठरविण्यात आलेली आहे. त्या प्रक्रियेमधून उमेदवार उपलब्ध होत नसल्यास काही प्रमाणात तात्पुरत्या स्वरुपात......

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, येथे आयोगाचा विषय नाही.

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, २५ ऑगस्ट, २००५ रोजी सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात एक शासन निर्णय काढलेला आहे, बऱ्याचवेळा असे घडते की, नियुक्त्या ह्या तात्पुरत्या स्वरुपात केल्या जातात. तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या केल्यानंतर ...... (Interrup-

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR

## WRIT PETITION NO. 1085 OF 2004

***Petitioner*** : Sanjay Motiramji Kharbade,aged about 42 years Service, R/o - Ramnagar, Bhandari Layout, Pusad, Distt. Yavatmal

***-Versus-***

***Respondents*** : (1) The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) Amravati University, through Registrar, Amravati., (3) Principal, Phulsing Naik Mahavidyalaya, Pusad, Distt. Yavatmal

*Smt. S.W.Deshpande, Advocate for Petitioner, Smt. Bharti Dangre, AGP for Respondent No. 1 State, Shri. V,.A. Kothale, Advocate for respondent No. 2 University, Shri. S.P.Palshikar, Advocate for respondent No. 3 College*

### CORAM : SHRI. JUSTICE V.C.DAGA AND SHRI. JUSTICE S.U.KAMDAR, JJ

This petition is filed for dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, as University has accorded approval. In view of the statement made by the counsel for respondent No. 3 Principal that fresh proposal with all the necessary documents and information has been forwarded to Amravati University as well as State, vide R.P.A.D. 8.10.2004 and in view of the statement made by the counsel for respondent No. 2 University that the same will be forwarded to the State and the Statement made by the counsel on behalf of the respondent no.1 State that action for dereservation of the post will be taken within 4 weeks, following minutes of order.

**MINUTES OF ORDER**

1. On receipt of fresh proposal, respondent No.2 Amravati University shall forward the same to State,

2. On receipt of the fresh proposal, **the State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, within 4 weeks**.

3. The petitioner will be given placement accordingly.

Nagpur

Dtr. 11.10.2004 Counsel for Petitioner

Counsel for Respondent No.1, Counsel for Respondent No.2, Counsel for Respondent No.3

*****

**Appendix 2 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र दोन** होय.

tions). Sir, let me complete ज्यावेळी रेगुलर अपॉईंटमेंट करण्याची वेळ येते त्यावेळी एखाद्या संस्थेला आरक्षण कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या शिक्षण संस्थेतील त्या उमेदवाराची ती जागा रिक्त राहू नये यासाठी काय केले पाहिजे, याकरिता राज्य सरकारने वेळच्या वेळी निर्णय घेतले आहेत. त्याप्रमाणे ३० मार्च १९८१ मध्ये मागास वर्गीयांसाठी आरक्षण ठेवण्याचा निर्णय झाला. आणि १९८३ मध्ये आरक्षित कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर बिगर मागासवर्गीयांच्या उमेदवाराची नियुक्ती त्या संस्थेने करावी अशाप्रकारची भूमिका घेण्यात आली. २९ सप्टेंबर ९८ ला एक वर्षामध्ये मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर वेगळी भूमिका घेतली गेली. माननीय सदस्यांनी त्यासंबंधी २५ जानेवारी १९९० च्या जी.आर. चा उल्लेख केला. हायकोर्टाने त्या जी.आर. प्रमाणे कारवाई करावी असे म्हटले आहे. त्याच आधारावर ५ वर्षे ते पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीला ती जागा द्यावी. या संपूर्ण विषयामध्ये एखाद्या पदावर रिझर्व्ह कॅटॅगरीमधील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद डिरिझर्व्ह करुन ते ओपन कॅटॅगरीतील उमेदवारांना देण्याच्या संदर्भातील निर्णय घेण्याचा हा प्रश्न आहे...

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदय सांगत आहेत ते बरोबर नाही. आपण समजून घ्या. हायकोर्टाच्या ऑर्डर्स मी माझ्या शब्दात कशाला सांगू? Why should I argue about it? Mr. Chairman, Sir, I will quote the judgement of the High Court. Sir, I quote: "The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State to de-reserve the post in the event the candidate from the reserved category is not available for a period of five years the posts should be de-reserved from the sixth year." याठिकाणी जज्जमेंट असे दिले आहे की, "Within two weeks from the date of receipt of the proposal from respondent no.6 College the State Government in turn is directed to issue necessary orders in regard to de-reservation of the post held by the petitioner and for regularisation of the petitioners services" माझे असे म्हणणे आहे की, हे ऑर्ग्युमेंट आपण आता इथे करण्यापेक्षा तिथे हायकोर्टात करायला पाहिजे होते. त्याठिकाणी तुम्ही तसे ते केले. माझे असे म्हणणे आहे की, अशा अनेक केसेसमध्ये मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. माझे म्हणणे असे की, मंत्रालयामध्ये चकरा मारायला लावण्याचे चक्र आपण तोडा. हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करा. यामध्ये मी तुम्हाला निर्णयाची पूर्व सूचना दिली आहे. तशी कारवाई आपण कराल काय?

**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती मी सांगत होतो.. मुळात एखादा आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद कसे भरावयाचे या संदर्भातील हा विषय आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य २५ जानेवारी १९९० च्या जी.आर. चा संदर्भ सांगत आहेत. त्यासाठी तुम्ही कोर्टाच्या जज्जमेंटची प्रत आणली आहे, ती प्रत माझ्याकडेही आहे. **१९९० चा जी.आर. कोर्टामध्ये प्रोडयूस करण्यात आला व त्या आधारावर कोर्टाने निर्णय दिला. त्याच्यापुढे काही गोष्टी आहेत...**

(माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख बसून बोलतात.)

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR
## WRIT PETITION NO. 1121 OF 2004

Vinod S/o Laurao Khalatkar, aged about 40 years occupation : service, r/o Gurudeo Nagar, Digras, Dist. Yavatimal. ....***Petitioner***

***-Versus-***

(1) The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) Amravati University, through Registrar, Amravati., (3) Principal, B.B.Arts, N.B.Commerce & B.P.Science College, Digras, Distt. Yavatmal.... ***Respondents***

*Mrs. S.W.Deshpande, Advocate for petitioner, A.G.P.For respondent no. 1, Mr. M.P.Gulhane, Advocate for respondent no. 2, Mr. R.J.Mirza, Advocate for respondent no. 3*

### CORAM : P.S.BRAHME AND B.R.GAVAI, JJ
### Dated : 9.2.2005

**JUDGEMENT : (per P.S.BRAHME,J) :** Heard. Rule made returnable forthwith. The learned counsel for respondents waive notice. Heard by consent of parties.

1. This petition is filed for dereservation of the post occupied by the petitioner from 6.2.1990 with all consequential benefits as the University has accorded approval.

2. The post which was occupied by the petitioner was reserved for ST/VJNT. Therefore, the post was advertised for 5 times for ST/VJNT. However, since ST/VJNT candidate was not available the petitioner was appointed and continued in service. The case of petitioner is that, though the Principal as well as the University requested the State for dereservation of the post, the same is pending. By letter dated 11.8.1993 the petitioner was accorded onward approval by the University.

3. The respondent no. 3 in its reply has categorically stated that the post of lecturer in English in which the petitioner is working since last 14 years had became vacant. The above post was reserved for ST/VJNT category candidate. However, inspite of issuing advertisement repeatedly as no candidate of the reserved category was available, the petitioner was selected and was given appointment by order dated 6.2.1990. It is further contended that respondent no. 1 had issued Government Resolution dated 25.1.1990 where under the policy is laid down regarding the dereservation of the post in the event the candidate from the reserved category is not available. It is also laid down therein that if no candidate from reserved category is available for a period of 5 years, then the post should be dereserved from the 6th year. It is further contended by respondent no. 3 that pursuant to the above mentioned policy, the respondent has sent a proposal dated 1.9.1990 for dereservation of the above mentioned post to the respondent no. 2 University and on 4.9.1993 the same proposal was sent to respondent no. 1 for consideration. However, the respondent no. 1 has taken no action even after receiving the above mentioned proposal.

4. The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the state to dereserve the post in the event the candidate from the reserved category is not available for a period of five years. It is specifically laid down in the said Government Resolution that if the candidate for reserved category is not available for a period of 5 years then the post should be dereserved from the 6th year. In this view of the matter, we feel that in the present case also the respondent no. 1 has to take action of dereservation of the post occupied by the petitioner. We therefore, direct respondent no. 3 to send a fresh proposal for dereservation of the post which is occupied by petitioner to respondent no. 1. **On receipt of fresh proposal, the respondent no. 1 State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 6.2.1990 with all consequential benefits within four weeks from the receipt of the proposal.** The rule is made absolute in the aforesaid terms.

*****

**Appendix 3 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र तिन** होय.

(अडथळा)

सभापती महोदय, माननीय सदस्यांचे एकदा विचारुन पूर्ण झाल्यानंतर मी उत्तर देतो...

**सभापती :** माननीय सदस्यांनी माननीय मंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. आपल्याला जर शंका असेल तर मी पुन्हा आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, २५ जानेवारीच्या जी.आर. मध्ये ५ वर्षापर्यंत हे पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी जर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराला कायम करावे अशाप्रकारचा जी.आर. आहे. त्या आधारे कोर्टामध्ये रिलिफ मागितले आहे. १९९१ मध्ये या संदर्भातील आणखी एक जी.आर. काढला गेला, **१९९४ मध्ये आणखी एक जी.आर. काढला गेला. दुर्दैवाने हा जी. आर. कोर्टामध्ये दाखविला गेला नाही.** एखादे आरक्षित असलेले पद डिरिझर्व्ह ठेवायचे असते त्यावेळी त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून आल्यानंतर तो प्रस्ताव सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण विभाग या दोन्ही विभागाकडे जातो व नंतर मुख्य सचिवांकडे जाऊन वरच्या पातळीवर त्या संदर्भात निर्णय होत असतो. बऱ्याच केसेसमध्ये असे आढळून आलेले आहे की, राखीव कॅटेगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही वा तो उमेदवार उपलब्ध होतोच असे नाही, त्या जागेवर ज्यांचे पोस्टींग केले जाते, ते उमेदवार तात्पुरत्या स्वरुपामध्ये असतात तरी देखील त्यांना प्रमोशन दिले जाते. तो त्या ठिकाणी पाच-सहा वर्षे काम करीत आहे, असे म्हटल्यानंतर डी-रिझर्व्हेशन करुन, त्याला कायम स्वरुपामध्ये नेमणूक द्याव्यात अशाप्रकारची भूमिका आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** तसे कोर्टाचे आदेश आहेत.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** न्यायालयाचे आदेश आहेत,याची सरकारलाही जाणीव आहे. न्यायालयाचे आदेश असतांना देखील या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक २५ ऑगस्ट २००५ रोजी या संदर्भातील प्रस्ताव पाठविलेला होता. ज्यावेळेला विद्यापीठाकडून संस्थांकडून अशाप्रकारचा प्रस्ताव येतो, त्यावेळेला त्यांनी **चेक-लिस्टप्रमाणे प्रोसिजर पूर्ण करुन राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला पाहिजे. तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केल्यानंतर त्या संदर्भात जी काही प्रोसिजर आहे, ती पूर्ण करुन शासन निर्णय घेते.** तरी देखील प्रश्न शिल्लक रहातो.या संदर्भात हायकोर्टाचे जज्जमेंट आल्यानंतर, सुप्रीम कोर्टाचे एक जज्जमेंट आले. ते म्हणजे त्या संस्थेमध्ये रिझर्व्हेशनच्या पदावर लागलेल्या उमेदवाराला कायम करता येणार नाही. त्या पदाकरिता फ्रेश ऑर्डर काढून नव्याने नियुक्त केले पाहिजे, अशाप्रकारची सुप्रीम कोर्टाने भूमिका घेतलेली आहे. त्या आधारावर २५ ऑगस्ट २००५ चा जी.आर. सरकारने काढलेला आहे. त्यावेळेस अशाप्रकारच्या केसेस सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविल्या जातात. त्यावेळेला **१९९० च्या जी.आर.चा आधार घ्यायचा की १९९४ च्या जी.आर.चा घ्यायचा किंवा २००५ सालच्या जी.आर.चा आधार घेऊन कारवाई करावयाची या संदर्भामध्ये निश्चित प्रकारे निर्णय घेण्यासाठी, काही कालावधी लागणार आहे.** या संदर्भात सरकारला अधिक वेळ लागणार आहे.

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR

## WRIT PETITION NO. 1112 OF 2004

Vivek s/o Haribhau Hiware aged about 41 years Occupation : Service, R/o Ujwal Nagar, Daryapur Road, Akot, Distt.. Akola ....***Petitioner***

***-Versus-***

(1) The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) Amravati University, through Registrar, Amravati., (3) Principal, Shri. Shivaji College, Akot, Distt. Akola.... ***Respondents***

*Mrs. S.W.Deshpande, Advocate for petitioner, A.G.P.For respondent no. 1 Mr. M.P.Gulhane, Advocate for respondent no. 2 Mr. R.J.Mirza, Advocate for respondent no. 3*

### CORAM : P.S.BRAHME AND B.R.GAVAI, JJ

### Dated : 9.2.2005

**JUDGEMENT : (per P.S.BRAHME,J) :** Heard. Rule made returnable forthwith.. The learned counsel for respondents waive notice.. Heard by consent of parties.

1. This petition is filed for dereservation of the post occupied by the petitioner from 6.9.1990 with all consequential benefits as the University has accorded approval.

2. The post which was occupied by the petitioner was reserved for ST/VJNT. Therefore, the post was advertised for 5 times for ST/VJNT However, since ST/VJNT candidate was not available the petitioner was appointed and continued in service. The case of petitioner is that, though the Principal as well as the University requested the State for dereservation of the post, the same is pending. By letter dated 20.8.1993 the petitioner was accorded onward approval by the University.

3. The respondent no. 3 in its reply has categorically stated that the post of lecturer in English in which the petitioner is working since last 14 years had became vacant. The above post was reserved for ST/VJNT category candidate. However, inspite of issuing advertisement repeatedly as no candidate of the reserved category was available, the petitioner was selected and was given appointment by order dated 6.9.1990. It is further contended that respondent no 1 had issued Government Resolution dated 25.1.1990 where under the policy is laid down regarding the dereservation of the post in the event the candidate from the reserved category is not available. It is also laid down therein that if no candidate from reserved category is available for a period of 5 years, then the post should be dereserved from the 6th year. It is further contended by respondent no. 3 that pursuant to the above mentioned policy, on 20.8.1993 the Assistant Registrar of University sent a communication and directed the respondent no 3 to submit the proposal for dereservation of the post of lecturer in English and forwarded it to the government. The respondent No.2 University also granted approval to the appointment of petitioner on 20.8.1993. The respondent no. 3 by communication dated 9.9.1993 forwarded the proposal to University for necessary, same is pending.

4. The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the state to dereserve the post in the event the candidate from the reserved category is not available for a period of five years. It is specifically laid down in the said Government Resolution that if the candidate for reserved category is not available for a period of 5 years then the post should be dereserved from the 6th year. In this view of the matter, we feel that in the present case also the respondent no. 1 has to take action of dereservation of the post occupied by the petitioner. We therefore, direct respondent no. 3 to send a fresh proposal for dereservation of the post which is occupied by petitioner to respondent no. 1. **On receipt of fresh proposal, the respondent no. 1 State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 6.9.1990 with all consequential benefits within four weeks from the receipt of the proposal.** The rule is made absolute in the aforesaid terms.

*****

**Appendix 4 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र चार** होय.

**डॉ.वसंत पवार** : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आता जे सांगितले, त्यामुळे फार मोठा अन्याय होणार आहे. शैक्षणिक संस्थेला त्या रिझर्व्हेशनच्या पदावर, एखाद्याची कायम नेमणूक करत असतांना विद्यापीठाची परवानगी घ्यावी लागते. आठ आठ वर्षे तो उमेदवार त्या रिझर्व्हेशनच्या पदावर काम करतो. त्या संदर्भातील दर वर्षी जाहिरात काढली जाते, त्याप्रमाणे दुसरा कोणी उमेदवार मिळत नाही, तोच उमेदवार सिलेक्ट होतो. अशा पध्दतीने तो उमेदवार त्या पदावर कायम रहात असेल तर ती जागा डी रिझर्व्हेशनची होईल म्हणून पुन्हा जाहिरात देण्यात येते. त्याही वेळेला तोच उमेदवार सिलेक्ट होतो. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ज्यावेळेस डी रिझर्व्हेशनचा प्रस्ताव पाठवितो, तेंव्हा आपण चेंज ऑफ रिझर्व्हेशन किंवा ते पद आपण ओपन कॅटेगरीतील उमेदवाराकरिता ट्रान्स्फर करावे काय ? आताच मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले की, २००५ चा जी.आर. काढलेला आहे. त्याच्या आधारे सगळे प्रस्ताव निकाली काढणार आहात काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, सन २००५ च्या जी.आर.च्या आधारावर आदेश काढण्यात आला. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अे- मुलानी, रजिस्टार ऑफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या विरुध्द तामिळनाडू या केसमध्ये **जुलै २००४ रोजी जज्जमेंट दिलेले आहे. ते जज्जमेंट माझ्याकडे आहे ते मी व्हरबायटम सभागृहास वाचून दाखविण्यास तयार आहे.** म्हणून ही बाब सरकारला तपासून घ्यावी लागेल. म्हणून यामध्ये तातडीने निर्णय करणे शक्य होणार नाही.

**प्रा.जोगेंद्र कवाडे** : सभापती महोदय, विशिष्ट राखीव प्रवर्गातील एखादा उमेदवार पाच वर्षापर्यन्त मिळत नसेल तर ते पद इतर आरक्षणाच्या प्रवर्गाकडे स्थानांतरित होते काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक संस्था चालक मागासवर्गीय उमेदवारांच्या जागेवर उमेदवार मिळत नसले, तर खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची आपल्या संस्थेत भरती करतात... आणि सातत्याने ते सुरु ठेवतात. आपल्या विशिष्ट लोकांच्या फायद्यासाठी अशा प्रकारची प्रथा काही शैक्षणिक संस्थांमध्ये सुरु केली जाते. एका वर्षी राखीव संवर्गातील उमेदवार मिळत नसेल तर पुढच्या वर्षी जाहिरात दिली पाहिजे. त्यांच्या नेमणुका तात्पुरत्या स्वरुपात होतात. अशा प्रकारची प्रक्रिया त्यांनी सतत पाच वर्षे केली काय ? हा प्रश्न माननीय मंत्रिमहोदय तपासून बघतील काय ? ज्या शैक्षणिक संस्थेंमध्ये राखीव जागेवर उमेदवार मिळत नाही म्हणून ते पद डी-रिझर्व करुन खुल्या प्रवर्गाला देणे ही बाब आमच्या शासनाच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाला शोभणारी आहे काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : यासंदर्भातील शासनाची भूमिका मी या सभागृहामध्ये अतिशय स्पष्ट केलेली आहे. १९८१ सालामध्ये कृषितर विद्यापीठांमध्ये आरक्षण ठेवण्याच्या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला. त्यानंतर पदे आरक्षित आहेत पण टिचिंग पोस्टसाठी उमेदवार मिळत नाहीत अशा वेळी काय करावयाचे ? यासंदर्भात वेळोवेळी काही निर्णय घेणे गरजेचे होते आणि शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत. यामध्ये २० ऑक्टोबर, १९८३ चा निर्णय आहे. २९ ऑक्टोबर, १९८९ चा निर्णय आहे. २५ जानेवारी, १९९० चा निर्णय आहे. २७ मार्च, १९९१ चा निर्णय आहे तसेच ५ डिसेंबर, १९९४ चा निर्णय आहे. यामध्ये राज्य सरकारसमोर दोन प्रश्न होते. एका बाजूला आरक्षित पद डी-रिझर्व करुन खुल्या प्रवर्गाला द्यावयाचे की अन्य मागासवर्गीय संवर्गातील लोकांना द्यावयाचे ? उदा. अनुसूचित जातीचे पद असेल तर ते पद डी-रिझर्व करुन अनुसूचित जमातीला किंवा ओबीसीला द्यावयाचे काय ? त्यासंदर्भात राज्य सरकारने

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR
## WRIT PETITION NO. 2651 OF 2004

***Petitioner*** : Kiran s/o Shankarrao Khandare, Aged about 36 yrs, Occ. Service, r/o P-40, c/o Adv. Jahagirdar, Mahasul Colony, Near Sapkal Hospital, Akola, Distt. Akola.

***-Versus-***

***Respondents*** : (1) The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai-32, (2) Amravati University, through Registrar, Amravati, (3) Principal, Shri. Dr. H.N.Sinha Arts & Commerce College, Patur, Distt. Akola.

*Smt. S.W. Deshpande, Advocate for Petitioner. Shri. Sonare, AGP for Respondent No. 1 Mr. C.S.Kaptan, For Respondent No. 3*

### CORAM : P.S.BRAHME AND B.R.GAVAI, JJ
### Dated : 2nd March, 2005

**ORAL JUDGEMENT : (per P.S.BRAHME,J) :** 1. Heard. Rule made returnable forthwith. Mr. Sonare, learned A.G.P. Waives notice for respondent no. 1, as also Mr. C.S.Kaptan, Adv. waives notice for respondent no. 3 Heard by consent of the parties.

2. Petitioner has filed the present petition seeking directions to respondent no. 1 to de-reserve the post occupied by the petitioner from 28.8.1991 with all consequential benefits. The posts which is occupied by the petitioner was reserved for scheduled cast/Scheduled Tribe. Therefore, the post was advertised for five times for scheduled caste/Scheduled Tribe. However, since the scheduled caste/Schedul tribe candidate was not available, the petitioner was appointed and continued in service. It is a matter of record that the principal of the institution i.e.respondent no. 3 by letter dt. 6.9.1995 requested the Director of Higher Education, Pune for de-reservation of the post. Respondent no. 3 also requested the State through Secretary, Higher Education and Employment for de-reservation of the post vide letter dt. 22.7.1995. In addition to that, respondent no. 3 has also sent reminder and second time proposal of dereservation to state G.A.D. through the University.

3. Respondent No. 3 in his submissions has contended that the respondent does not dispute Government Resolution. However, it is for respondent no. 1 State Government to de-reserve the post for a specified period. It is also contended that respondent has made such request for dereservation. It is a matter of record that respondent no. 3 has forwarded the proposal for dereservation of the post.

4. The Government Resolution dt. 25.1.1990 makes it imperative for the State to dereserve the post in the event the candidate from the Reserved category is not available for a period of five years. It is specifically laid down in the said Govt. Resolution that if the candidate in the reserved category is not available for five years the post should be de-reserved from the sixth year. In the case before hand, as stated earlier, respondent no. 3 has already forwarded the proposal to the State to take a decision for dereservation of the post which is occupied by the petitioner. In such a state of facts and in the light of the Govt. Resolution dt. 25.1.1990 it is imperative on the part of the respondent no. 1 to take action for de-reservation of the post. for occupation by petitioner. We, therefore, direct respondent no. 3 to send fresh proposal for de-reservation of the post, which is occupied by the petitioner to respondent no. 1. **Respondent no. 1 on receipt of the fresh proposal, shall take action of de-reserving of the post from 28.8.1991 with all consequential benefits within four weeks from receipt of the proposal. Respondent No. 3 to take fresh proposal within two weeks.**

Rule is made absolute in the aforesaid terms.

*****

**Appendix 5 :** नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी, मा. प्रधान सचिव, उच्चशिक्षण यांना पाठविलेल्या निवेदनासोबतचे हे **सहपत्र पाच** होय.

भूमिका घेतली होती तरी सुध्दा शासनाच्या या सगळ्या निर्णयानंतर आणि सन्माननीय हायकोर्टाच्या तसेच सन्माननीय सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर या विचारामध्ये आता स्पष्टता आलेली आहे. यासंबंधी आणखी नवीन निर्णय राज्य सरकारला घेणे आवश्यक आहे. हा विषय सामान्य प्रशासन विभागाच्या संबंधात आहे. मी या सभागृहामध्ये स्पष्ट केलेले आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारला काही कालावधी लागणार आहे.

**प्रा. बी. टी. देशमुख** : या प्रश्नात अंतर्भूत नसलेल्या बाबींचा निर्णय घेण्यासाठी शासनाला कालावधी लागेल हे मी समजू शकतो. **पण ज्या प्रश्नाचा निर्णय हायकोर्टाने दिलेला आहे. तेथे कालावधी लागण्याचे कारण काय?** माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, ते नियमित भरलेले नव्हते परंतु ही गोष्ट खरी नाही. ड्युली कॉन्स्टीट्युटेड सिलेक्शन कमिटीने त्यांची निवड केली व विद्यापीठाने ॲप्रूव्ह करुन रेग्युलर अपॉइन्ट केले होते. दरवर्षी जाहिरात दिली पाहिजे. रिझर्व कॅटेगरीतील उमेदवार मिळाल्यानंतर याला जावे लागेल असे प्रत्येक ऑर्डरमध्ये आहे. हायकोर्टाने ते तपासले आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये असे आहे की, पाच वर्षे त्या कॅटेगरीतील उमेदवार मिळाला नाही तर ताबडतोब ते पद डी-रिझर्व केले पाहिजे. हे सर्व लोक १९९० च्या अगोदरचे आहेत. हायकोर्टाचा निर्णय सुध्दा २००३ मधील आहे. हायकोर्टाचा २००३ चा निर्णय सन १९९४ च्या जी.आर.ने ओव्हर रुल करणे बरोबर नाही. अशा प्रकारे काही लोकांना मंत्रालयाने स्टे दिला. नंतर स्टे व्हॅकेट केला आणि ती पदे अनारक्षित केली. येथे तर हायकोर्टाचा निर्णय झाला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

**प्रा. बी.टी. देशमुख** : सभापती महोदय, यामध्ये प्रश्नाच्या बाहेरचे बरेच मुद्दे त्यांनी आणलेले आहेत. त्याचा निपटारा करुन मी माझा प्रश्न विचारतो. हे लोक दरवर्षी भरले होते हे म्हणणे चुकीचे आहे. ते ड्युली कॉन्स्टिट्युटेड सिलेक्शन कमिटीकडून निवड झाल्यावर अपॉइन्टेड तसेच ड्युली ॲप्रूव्हड होते. माझा असा प्रश्न आहे की, माननीय मंत्रिमहोदय जे म्हणत आहेत त्या सर्व मुद्यांचा विचार करुन हायकोर्टाने निर्णय दिला. तो निर्णय एकाच बाबतीत नाही तर ५-१० बाबतीत दिलेला आहे. त्यातील काही बाबींच्या कॉपीज निवेदनाला जोडून आम्ही पाठविलेल्या आहेत. मंत्रालयातील जस्टीस केंद्रे यांनी पत्र लिहिले आहे. हायकोर्ट असे म्हणते की....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा. मी यासंदर्भात असे करतो की, सन्माननीय मंत्रिमहोदय तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि इतर अन्य सन्माननीय सदस्य असतील त्यांची २० तारखेला बैठक बोलवतो.

**प्रा. बी.टी.देशमुख** : माननीय सभापती महोदय, आपण जे सांगितले ते माननीय मंत्री महोदयांना मान्य असेल आणि माननीय मंत्री महोदय हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणार असतील तर माझी त्याला ना नाही.

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, आपण जे सुचविले ते योग्य आहे. मिटींग घेण्यास माझी हरकत नाही. तरी देखील ज्या केसेस सादर केलेल्या आहेत त्या विहित कालावधीमध्ये तपासून घेण्यात येतील. **तसेच सरकारच्या निर्णयाचा अनादर करुन एखाद्या अधिका-याने निर्णय केला असेल तर त्या अधिका-याला निलंबित केले जाईल.**

*****

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR**

# CONTEMPT PETITION NO. 180 OF 2006
# IN
# WRIT PETITION NO. 2410 OF 2003

(Decided on 2nd of September, 2004)

***Petitioner*** : Manohar Rangrao Thakare, aged about 46 years, Resident of Shivaji Nagar, Nerparsopant, Dist Yavatmal

***-Versus-***

***Respondent*** : Smt. Joyce Shankaran, Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-32

## CONTEMPT PETITION UNDER ARTICLE 215 OF THE CONSTITUTION OF INDIA AND UNDER SECTION 12 OF THE CONTEMPT OF COURTS ACT, 1971

1 to 15......... Not Printed

16. In view of the above, it is necessary that appropriate action be taken against the respondent under Article 215 of the Constitution of India for committing the Contempt of the judgment given by this Honourable Court in Writ Petition No. 2410 of 2003 and respondent be punished. The approach of the respondent amounts to Civil Contempt as defined under section 2 (b) of the Contempt of Courts Act, 1971. The respondent is liable for apropriate punishment under section 12 of the Contempt of Courts Act, 1971. It is necessary that during the pendency of the instant Contempt petition, the respondent be directed to purge the contempt and issue necessary orders for dereservation of the post, in which the petitioner is working in the Nehru Arts and Commerce College, Nerparsopant and provide other consequential benefits as directed by this Honourable Court in Writ Petition No. 2410 of 2003. The cause of action is continuing and this Honourable Court has the jurisdiction to entertain and decide the instant Contempt petition.

**Prayer :** It is prayed that;

a) it is necessary that appropriate action be taken against the respondent under Article 215 of the Constitution of India for committing the Contempt of the Judgment passed by this Honourable Court in Writ petition No. 2410 of 2003.

b) the respondent be suitably punished under section 12 of the Contempt of Courts Act, 1971.

c) the respondent be directed to purge the contempt and issue the necessary orders for dereservation of the post, in which the petitioner is working, in the Nehru Arts and Commerce College, Nerparsopant and the respondent be directed to provide other consequential benefits as directed by this Honourable Court in Writ petition No. 2410 of 2003.

d) any other appropriate order deemed fit in the facts of the case, may kindly be passed, in the interests of justice, including grant of costs of the instant contempt petition.

Place : Nagpur
Date 22.07.2006

Manohar Rangrao Thakare
21.7.2006

M.I.Khan, Councel for Petitioner

***Note :*** *The Following orders were passed by the Honourable Court on 28th July 2006* ***"Issue notice to the Respondent to show cause why contempt proceedings should not be initiated against her. Returnable after six weeks"***

(५)

# अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक ६ जुलै २००६ : दुसरे अधिवेशन २००६*

(३) * १७३४२ **श्री. रमेश निकोसे, प्रा.बी.टी. देशमुख, श्री.व्हि.यु. डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल. अैनापुरे, डॉ.एन.पी. हिराणी** : तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ ला दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे पाटील** : (१) होय.

(२) व (३) निवेदनात नमुद केलेल्या पाच प्रस्तावा संदर्भात पदे अनारक्षित करुन संबंधितांना सेवा सातत्याचे लाभ लागू करण्याबाबत कार्यवाही चालू आहे. अंतिम निर्णय होताच आदेश काढण्यात येतील.

**श्री.रमेश निकोसे :** सभापती महोदय, हायकोर्टाने आदेश दिल्यानंतरसुध्दा अनारक्षित पदे भरण्यात आलेली नाहीत. **आताच घटना घडलेली आहे की, हायकोर्टाने व सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या विरुध्द वागल्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याला व अधिकाऱ्यास एक महिना जेलमध्ये जावे लागले.** याठिकाणी माझा एवढाच प्रश्न आहे की, आपण जी लवकरात लवकर कारवाई करु असे जे म्हटले आहे ती कारवाई आपण लवकरात लवकर किती दिवसात करणार ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, मागच्यावेळीही हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आला होता. त्यावेळी या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहात चर्चा झाल्यानंतर आपल्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. या विषयाचा संबंध इतर विभागांशी येत असल्यामुळे याबाबतीत सचिव स्तरावर बैठक घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे बैठकही झाली. हा अनारक्षित पदांचा विषय समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामान्य प्रशासन विभागांशीही संबंधित येतो. त्यामुळे त्या विभागांचाही याबाबतीत सल्ला घेणे आवश्यक आहे. या संदर्भातील सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने दिनांक २५ ऑगस्ट,२००५ रोजी एक शासन निर्णयही काढलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात या सर्व पाचही प्रकरणांचा अभ्यास करुन राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. याबाबतीत राज्य सरकार तीन महिन्यांमध्ये अंतिम निर्णय घेईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ही दुर्दैवाची गोष्ट आहे की, हायकोर्टाने निर्णय देऊनसुध्दा आपले अधिकारी विरोधात पत्रक काढतात व सभागृहाला चुकीची माहिती देतात. या प्रश्नासंबंधी मागे १८ एप्रिल २००६ रोजी सभागृहामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "विद्यापीठाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव दिनांक ५.१२.१९९४ च्या शासन निर्णयातील अटीनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कारवाई करणे शक्य झाले नाही." माननीय सभापती महोदय, यासंदर्भात ज्यावेळी आपल्या दालनामध्ये बैठक झाली. त्यावेळी २-३ अधिकाऱ्यांनी सांगितले की, १९९४ च्या शासन निर्णयानुसार विद्यापीठाने प्रस्ताव पाठविला नाही. हायकोर्टमध्ये शासनाच्या वकिलांनी हे म्हणणे मांडलेले आहे की, "सन १९९४ चा शासन निर्णय यांना लागु आहे." परंतु "विद्यापीठाच्या वकिलांनी हायकोर्टात असे सांगितले की, "१९९४ चा शासन निर्णय त्यांना लागू होत नाही, त्यांना १९९० चा शासन निर्णय लागू होतो." हायकोर्टाने त्यावर दिनांक ३ जून,२००१ रोजी व ६ फेब्रुवारी,२००४ रोजी याचिका क्रमांक ३३०५ ऑफ २००१ मध्ये निकाल दिला. निकालाच्या पॅरा पाचमध्ये असा निर्णय दिला आहे की, "Provisions of Government Resolution dated 5th December, 1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively" असे कोर्टाने म्हटले. पध्दत अशी आहे की, एकदा कोर्टाने निर्णय दिला की, सरकारी वकील मग त्यानंतर त्यावर प्रतिवाद करीत नाहीत. त्याप्रमाणे पुढच्या पुढच्या प्रकरणात यांनी तसा युक्तीवाद करणे सोडून दिले. पुढचा निर्णय याचिका क्रमांक २४१० ऑफ २००३ मध्ये दिनांक २-९-२००४ रोजी झाला. यामध्ये कोर्टाने असे म्हटले आहे की, "No one has disputed the entitlement of the Petitioner to be regularized in the post in the sixth year as provided in the G.R. dated 25-1-1990" हे सर्व हायकोर्टात झाल्यानंतर 'केंद्रे' म्हणून जे राज्य शासनातील कक्ष अधिकारी आहेत ते सन १९९४ चा जी.आर.लागू करणारे परिपत्रक काढीत आहेत. म्हणून या अधिका-यांवर सर्वप्रथम कारवाई करण्याची गरज आहे. **एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर अशा प्रकारे आदेश देणारे हे 'केंद्रे' नावाचे कक्ष अधिकारी काय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश आहेत काय?** सभापती महोदय, हा अतिशय खेळखंडोब्याचा प्रकार आहे. अर्धा डझन प्रकरणांमध्ये १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे कारवाई करा असा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा १९९४ च्या जी.आर.चे पालन करा असे शासनाचे म्हणणे हे सर्वस्वी चूक आहे. तेंव्हा, हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे मंत्रीमहोदय ३ महिन्याच्या आत निर्णय घेणार काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात दिनांक १८ एप्रिल २००६ रोजी या सभागृहात चर्चा झाली होती. त्यानंतर दिनाक २७ एप्रिल २००६ रोजी आपल्या दालनात चर्चा झाली. ही चर्चा

---

क्रमांक संमाबाअवि/२०/बीसीसी/एम/१९८८/२००६
दिनांक ०५ ऑक्टोबर २००६

प्रति,
**श्री. रा.वो. सरवदे,**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

**विषय :-** अमरावती विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे अनारक्षित करण्याबाबत.

महोदय,

**आपण दूरध्वनीवरून दिलेल्या संदेशाप्रमाणे तसेच फॅक्सद्वारे पाठविलेल्या यादीतील अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात कळविण्यात येते की,** या विद्यापीठात शासन निर्णय क्रमांक एएमयु-२५९९/(१७७/९९)/विशि-२, दिनांक १२ जानेवारी, २००४ अन्वये मागासवर्ग कक्ष सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली असून दिनांक १९.३.२००४ पासून मागासवर्ग कक्ष सुरू झालेला आहे. त्यापूर्वी सं.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या विशेष विभागाकडे या विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाची जबाबदारी होती. त्यानुसार सं.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या विशेष विभागाकडून सोबत जोडलेल्या यादीतील अनुक्रमांक १,२,३,७,८,९,१०,१२,१३,१४ व १८ वरील अधिव्याख्यातांना खुल्या प्रवर्गात व अ.क्र. १५ वरील अधिव्याख्यात्यास विमुक्त जाती प्रवर्गात नियुक्त करण्यात आल्याचे प्रमाणित करुन देण्यात आलेले आहे. तद्वतच, अनुक्रमांक ४,५,११,१६ व १७ वरील अधिव्याख्यातांना सदर महाविद्यालयाने सादर केलेल्या अभिलेखाच्या आधारे खुल्या प्रवर्गात नियुक्त करण्यात आल्याचे या विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाने प्रमाणित करुन दिले आहे. अनुक्रमांक ६,१९ व २० वरील अधिव्याख्यात्यांची बिंदूनामावलीत नोंद नाही.

उपरोक्त माहितीवरून शासनाचे समाधान होईल अशी अशा आहे.

आपला विश्वासू
**(डॉ.कैलाश खामरे)**
कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***अमरावती विभागातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील आरक्षित पदे अनारक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव***

*(एकूण २० शिक्षकांचा प्रस्ताव सोबत दिला असून तो पृष्ठ १० वर दिलेल्या दिनांक ४ नोव्हेंबर २००६ च्या पत्रासोबत दिलेल्या प्रमाणे आहे)*

झाल्यानंतर त्याच दिवशी सर्व सचिवांबरोबर बैठक घेण्यात आली. असे आहे की, सरकारमध्ये procedure to be followed. त्याप्रमाणे प्रोसिजर पूर्ण होऊन सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १९/०६/२००६ रोजी हे प्रकरण आमच्या विभागाकडे प्राप्त झाले आहे. जी.आर.चे मेरिट, हायकोर्टाच्या निर्णयाच्या मेरिटमध्ये मी जात नाही. परंतु, या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. म्हणून मी असे सांगितले की, ३ महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर गरज असेल तर सुप्रिम कोर्टामध्ये अपील दाखल करावयास हवे. अन्यथा हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास हवी. कारण, हायकोर्टाचा निर्णय जीवंत आहे. त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारवर बंधनकारक आहे. नाही तर कन्टेम्प्ट

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग*

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२**

***क्र. एनयुसी-२००६/(१०५/०६) मशि-६ : दिनांक ०४ नोव्हेंबर, २००६***

प्रति,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**विषय** :- अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत.

**संदर्भ** :- १) संचालक, उच्च, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे क्र. एनजीसी/२००६/पदे अनारक्षीत/अवि/मवी-३ दि. १२.९.२००६ चे पत्र.
२) आपले क्र. संमाबा अवि/२०/बीसीसी/एम-१९८८/२००६, दि. ५ ऑक्टोबर, २००६ चे पत्र.

अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत संदर्भाधीन दि. ५ ऑक्टोबर, २००६ च्या पत्रान्वये, बिंदूनामावलीनुसार अ.क्र. ६,१५,१९,२० वरील पदे वगळता इतर पदे खुल्या वर्गातील असल्याचे अभिप्राय दिले आहेत त्यानुसार **सदर पदे खुल्या वर्गातील आहेत असे दिसते त्यामुळे ती पदे बिनराखीव करण्याचा प्रश्नच येत नाही,** ही बाब लक्षात घेता या बिंदूवर असलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता देण्याची योग्य ती कार्यवाही प्रचलित नियमानुसार करण्यात यावी. अ.क्र. ६,१५,१९,२० वरील प्रस्ताव तपासून स्वतंत्ररित्या सादर करावेत.

२. याबाबत अमरावती विद्यापीठातंर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत दाखल झालेल्या याचिकांच्या अनुषंगाने Review petition दाखल करण्याबाबत सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांना सुचित केले होते. परंतु वरील वस्तुस्थिती लक्षात घेता आता Review petition करण्याची आवश्यकता नसल्यामुळे सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती यांनी Review petition दाखल करण्याची कार्यवाही करण्याची गरज नाही तसेच या प्रकरणी दाखल झालेल्या अवमान याचिकांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे वस्तुस्थिती मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावी. असे सहसंचालकास या पत्राची प्रत अग्रेषित करुन कळविण्यात येत आहे.

(रा.चो.सरवदे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

## *अमरावती विभागातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील आरक्षित पदे अनारक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव*

*(१) महाविद्यालयाचे नाव (२) कर्मचाऱ्याचे नाव (३) पदनाम (४) विषय (५) पद अनारक्षित करण्याची कारणे (६) बिंदू नामावलीप्रमाणे नोंदी*

१. (१) नेहरु कला वाणिज्य महाविद्यालय, नेरपरसोपंत जि. यवतमाळ (२) श्री.एम.आर.ठाकरे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

२. (१) बी.बी. कला वाणिज्य महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ (२) श्री.जी.एस.खळदकर (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

३. (१) फुलसींग नाईक महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (२) श्री.एस.एस. खरबडे (३) अधिव्याख्याता (४) संगणकशास्त्र (५) नव्याने केलेल्या बिंदू नामावली प्रमाणे पद आरक्षित नाही. म्हणून सदर पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

४. (१) श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट जि. अकोला (२) श्री.के.एस.हिवरे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

५. (१) डॉ.एच.एन.सिन्हा कला वाणिज्य महाविद्यालय, पातूर जि. अकोला (२) श्री.के.एस. खंडारे (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

६. (१) भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा जि. अमरावती (२) श्रीमती एस.एस.गावंडे (३) अधिव्याख्याता (४) गृहअर्थशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षीत करण्यास हरकत नाही. (६) नोंद नाही

७. (१) भारतीय महाविद्यालय, अमरावती (२) श्री.जी.एस. कुरुप (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) सदर अधिव्याख्याता दुसऱ्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून गेलेले असल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

८. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय, खामगाव (२) श्री.सी.एम.जाधव (३) अधिव्याख्याता (४) इलेक्ट्रॉनिक्स (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

९. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय खामगाव (२) श्री.एस.ओ.वानखेडे (३) अधिव्याख्याता (४) संख्याशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१०. (१) जी.एस.विज्ञान कला वाणिज्य व महाविद्यालय, खामगाव (२) श्री.पी.एस.बोडखे (३) अधिव्याख्याता (४) संगणकशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

११. (१) पुंडलीक महाराज महाविद्यालय, नांदूरा जि. बुलढाणा (२) श्री.ए.एल.कुलट (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) शिवाजी शिक्षण संस्थेने संस्थेची एकत्रित बिंदू नामावली ठेवल्यामुळे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१२. (१) अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (२) श्री.जी.पी.पाचडे (३) अधिव्याख्याता (४) रसायनशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१३. (१) फुलसिंग महाविद्यालय, पुसद (२) श्री.एस.आर.जाधव (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१४. (१) गो.से.गावंडे महाविद्यालय, उमरखेड (२) श्री.एस.पी.राठोड (३) अधिव्याख्याता (४) रसायनशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१५. (१) मुंगसाजी महाविद्यालय, दारव्हा (२) श्री.एस.एस.जाधव (३) अधिव्याख्याता (४) मराठी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) विमुक्त जाती

१६. (१) कला वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरव (२) श्री.ए.आर.खान (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१७. (१) के. एन.ए.देशमुख कला वाणिज्य महाविद्यालय, चांदूरबाजार (२) श्री.व्ही.एन. वसुले (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१८. (१) जगदंबा महाविद्यालय, अचलपूर (२) श्री.पी.आर.भडके (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) खुले

१९. (१) तक्षशीला महाविद्यालय, अमरावती (२) कु.एस.ए. कहेकशा (३) अधिव्याख्याता (४) इंग्रजी (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) नोंद नाही

२०. (१) तक्षशीला महाविद्यालय, अमरावती (२) कु.एस.डी.श्रीखंडे (३) अधिव्याख्याता (४) राज्यशास्त्र (५) नविन बिंदू नामावली प्रमाणे पद अनारक्षित करण्यास हरकत नाही (६) नोंद नाही

स्वा./- **शिक्षण संचालक,**
(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे

स्वा./- **कुलसचिव**
संत गाडगे बाबा,
अमरावती विद्यापीठ

ऑफ कोर्ट होऊ शकतो. हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे परिपत्रक काढणे हे खरे कायदेशीर आहे. त्यामुळे सभागृहात अशा प्रकारची चर्चा आपण होऊ देता कामा नये. त्यांना जर हायकोर्टाचा निर्णय मान्य नसेल तर त्यांनी सुप्रिम कोर्टात जावे. परंतु, सुप्रिम कोर्टात न जाता हायकोर्टाची अंमलबजावणी न करणे हे बेकायदेशीर आहे आणि म्हणून आपले संरक्षण आम्हाला हवे आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** देशाच्या घटनेप्रमाणे हायकोर्टाने दिलेल्या निर्णयावर या ठिकाणी चर्चा करता येत नाही. 'केंद्रे' नावाच्या कक्ष अधिका-याने हायकोर्टाच्या निर्णयाविरोधी परिपत्रक काढलेले आहे, जो त्यांचा अधिकार नाही. एकदा हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रीमहोदय जी सामान्य प्रशासन विभाग वगैरे प्रोसिजर सांगत आहेत त्याचे कौतुक करता येणार नाही. म्हणून आपण याबाबत ठामपणे सांगितले पाहिजे की, हायकोर्टाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी झाली पाहिजे. एकदा तुमचे म्हणणे हायकोर्टात अमान्य झाल्यानंतर, हायकोर्टाने अर्धा डझन प्रकरणी एकसारखे निर्णय दिल्यानंतर, केंद्रेंसारख्या अधिका-याने हायकोर्टाच्या निर्णया विरोधी परिपत्रक काढले आहे त्यामुळे या सभागृहाची प्रतिष्ठा बाधित होते. त्यामुळे सभापती महोदय, आपण या प्रश्नावर मागच्या वेळी आपल्या दालनामध्ये बैठक बोलावली होती.

**सभापती :** सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी त्यांच्या विवेचनावरुन सप्लिमेंटरी माहिती, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, या ठिकाणी दिली आहे. **त्यांचे जे मत आहे तेच माझेही मत आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते, हे गृहीत असते आणि तो निर्णय स्वीकारणे गरजेचे आहे.** या अनुषंगाने शासनाला काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे. **माझ्या दालनामध्ये २७ एप्रिल २००६ रोजी सविस्तर चर्चा झाली त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे, असे मी बोललो होतो.**

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे बोलणे Contempt of court आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा करता येत नाही, हा जो आपला समज आहे तो आपण काढून टाका. न्यायालयाच्या निर्णयावर ॲनॅलिसीस करता येत नाही. न्यायालयाच्या निर्णयावर विरोधी मत व्यक्त करता येत नाही.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे आणि तो आपल्यावर बंधनकारक आहे. तो निर्णय आपल्याला आवडला नसेल तर आपण सुप्रिम कोर्टामध्ये अपिल करा आणि हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती मिळवा. आपण हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती घेतलेली नाही. हायकोर्टाचा निर्णय अजून जीवंत आहे. आपण असे सांगत आहात की, आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे फाईल पाठविलेली आहे. आपण त्यावर क्रिटीसाईज करणारा जी.आर. काढलेला आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, केस समजून न घेता भूमिका मांडली जात आहे. ज्यावेळी एखाद्या विद्यापीठामध्ये किंवा एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये आरक्षित पदे असतात त्या आरक्षित पदांसाठी उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ...(अडथळा) तुम्ही जे बोलता ते रेकॉर्डवर आले पाहिजे आणि मी जे बोलतो ते रेकॉर्डवर येऊ नये काय ? मी हायकोर्टाचा कन्टेम्प्ट करीत असेल तर I am ready to face it. Why the hon. members are worried?

**Shri Nitin Gadkari:** It is difficult for us to allow you in this House.

**Shri Dilip-Valse Patil :** Let the House allow you in this regard. जसा हायकोर्टाचा निर्णय आहे तसा सुप्रिम कोर्टाचा सुध्दा निर्णय आहे. आपण हायकोर्टाच्या निर्णयाची चर्चा करीत आहोत. मागच्या अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा झाली. सभागृहामध्ये हा विषय कनक्ल्यूड होत नाही असे ज्यावेळी निदर्शनास आले त्यावेळी माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये बैठक घेण्याचे ठरले. हायकोर्टाने दिलेला निर्णय काय आहे? आणि सुप्रिम कोर्टाने दिलेला निर्णय काय आहे हे त्यावेळी आपल्या निदर्शनास आणून दिले. ॲडव्होकेट जनरलला आपण निमंत्रित केले तरी त्यास माझी काही हरकत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** माननीय मंत्री महोदय जे म्हणतात त्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरलला बोलवा ना! ते आम्हाला मान्य आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हायकोर्टाच्या निर्णयाचा जो अर्थ लावत आहेत तो त्यांच्या दृष्टीने बरोबर असला तरी सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची भूमिका आपल्याला समजून घेतली पाहिजे. मुद्दा असा आहे की, एखाद्या विद्यापीठामध्ये किंवा एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित केलेली पदे अनारक्षित करण्याबाबतचा हा मुद्दा आहे. जर आरक्षित पदासाठी ५ वर्षामध्ये उमेदवार मिळाला नाही तर ते पद अनारक्षित केले जाते. परंतु दुसरी व्यवस्था अशी आहे की, आरक्षित पदासाठी उमेदवार मिळाला नाही तर विदीन कॅटॅगरीचा उमेदवार उपलब्ध असल्यास ते पद भरले जाते. अमरावती विद्यापीठातील ५ शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आता तात्पुरत्या स्वरुपामध्ये तेथे काही कर्मचारी नोकरीला लागलेले आहेत. जर सुप्रिम कोर्टाचा निर्णय अनारक्षित पदांच्या बाजूने लागला तर आता जे लोक नोकरीला लागलेले आहेत त्यांना कन्टीन्यू करता येईलच असे नाही. नवीन लागलेल्या लोकांना कन्टीन्यू करता येईल. येथे आग्रह असा दिसतो आहे की, जे सेवेमध्ये कर्मचारी आहेत त्यांनाच कायम करावे. त्याला देखील माझी काही हरकत असण्याचे कारण नाही. परंतु हायकोर्टाचा आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय यामध्ये जो काही आहे त्याचा विचार करून, सामान्य प्रशासन विभागाने आमच्याकडे फाईल पाठविली आहे. **त्यामध्ये लीगल ओपिनियन घेण्यासाठी देखील वेळ लागणार आहे, त्यासाठी सुमारे ३ महिने लागतील.** म्हणूनच मी सांगितले की, त्या ३ महिन्यामध्ये आम्ही यामध्ये अंतिम निर्णय घेऊ.

**प्रा. जोगेंद्र कवाडे :** सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये १८ एप्रिलला या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झाली होती आणि त्यात समाधान न झाल्याने पुन्हा २८ एप्रिलला आपल्या दालनामध्ये या संबंधात चर्चा झालेली आहे. याबाबतीत वारंवार आम्ही आपली भूमिका मांडलेली आहे. आरक्षित वर्गातील पदांच्या बाबतीत मला नामदार मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, अशी आरक्षित पदे सर्वसाधारण वर्गासाठी अनारक्षित करता येतात काय ? नसेल करता येत तर यामध्ये आता आपण ज्याप्रमाणे नियम सांगितला त्याप्रमाणे आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार मिळत नसेल तर ती आरक्षित पदे त्याच वर्गवारीतील दुसऱ्या कॅटेगरीतील उमेदवारांना देण्यात यावीत. ही बाब आपण हायकोर्टाच्या निदर्शनास आणून दिली आहे का ? सभापती महोदय, आरक्षित पदे कोठल्याही परिस्थितीत अनारक्षित केली जाऊ नये अशी आमची ठाम भूमिका आहे हेही मला येथे सांगितले पाहिजे.

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, **या संबंधात हायकोर्टामध्ये काय युक्तीवाद केला गेला आहे याची माहिती आता माझ्याकडे नाही. ती मी रेकॉर्ड पाहून सांगू शकेन.** परंतु आपल्या राज्यामध्ये जे या संबंधातील नियम आहेत त्यानुसार एखाद्या कॅटेगरीतील पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर पुढे पाच वर्षेपर्यंत दरवर्षी त्या पदांसाठी जाहिरात देऊन त्या कॅटेगरीतील पात्र उमेदवार मिळविण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत आणि पाच वर्षामध्ये असे प्रयत्न करूनही पात्र उमेदवार मिळाला नाही तर पाचव्या वर्षी ते पद त्या पुढील आरक्षित कॅटेगरीतील पात्र उमेदवारातून, म्हणजे within category मध्ये भरण्याचा प्रयत्न करावा आणि तेही जमले नाही तर ६व्या वर्षी ते पद आदिवासी कल्याण, समाजकल्याण, सामान्य प्रशासन या विभागांच्या सल्ल्याने अनारक्षित करण्यात येईल. तर त्या दृष्टीने प्रोसिजर सुरू आहे.

*****

***महाराष्ट्र शासन***

***शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)***

***महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१***

**क्र. एनजीसी/लवंसु/२००६/अवि/मवि-३**

**दिनांक : १७.११.२००६**

प्रति,

सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय** :- अमरावती विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील पदे अनारक्षित करणेबाबत.

**संदर्भ** :- शासन पत्र क्र. एनयुसी/२००६/(१०५/०६) मशि-६ दि. ४.११.२००६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे. अमरावती विद्यापीठाने दिनांक ५.१०.२००६ च्या पत्रामध्ये दिलेल्या माहितीवरुन अ.क्र. ६,१५,१९,२० वगळून इतर सर्व पदे खुल्या संवर्गातील असल्याचे दिसुन आल्यामुळे ती पदे बिनराखीव करण्याचा प्रश्नच येत नाही. अ.क्र. ६,१५,१९,२० वरील प्रस्ताव तपासून स्वतंत्ररित्या सादर करावेत.

त्याचप्रमाणे या संदर्भातील न्यायालयीन प्रकरणामध्ये आता Review petition दाखल करण्याची गरज नाही तरी संदर्भिय शासन पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे ही वस्तुस्थिती मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनाला सादर करुन त्याची प्रत या संचालनालयास सादर करावी.

डॉ.के.एम.कुळकर्णी

शिक्षण संचालक, (उच्चशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

***प्रा.बी.टी.देशमुख,** विधानपरिषद सदस्य, ३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती. - ४४४ ६०४***

*क्रमांक : IV / एलसी/६५ : फोन नं. नि. (०७२१)२५३००८० : का. २६६३६४६*

**दिनांक : ३.१०.२००६**

प्रति,

**मा. सभापती,**

महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई.

**विषय** :- उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करण्याची अनेक प्रकरणात घेतलेली भूमिका.

**संदर्भ** :- (१) गुरुवार, दिनांक ६ जुलै २००६ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १७३४१ ला मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी दिलेले लेखी उत्तर व त्यावर त्यानंतर झालेली अनुपुरक चर्चा.

(२) नुटाच्या सहसचिवांनी दिनांक ३० मे २००५ रोजी पाठविलेले निवेदन, (यापूढे उल्लेख निवेदन) जे मिळाल्याचे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी उक्त प्रश्नाच्या लेखी उत्तरात मान्य केलेले आहे.

मा. महोदय,

विदर्भातील संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या अनेक शिक्षकांच्या बाबतीत २५ जानेवारी १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे पदे अनारक्षित करण्याची कारवाई उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत केली जात नाही. अशा गेल्या अनेक वर्षापासून तक्रारी होत्या. त्यातील अनेक शिक्षकांनी मा. उच्च न्यायालयापुढे याचिका दाखल केल्या. त्याप्रकरणी न्यायालयांनी दिलेल्या निकालांची अंमलबजावणी उच्च व तंत्रशिक्षण विभाग करीत नाही, अशा तक्रारीसुद्धा सातत्याने करण्यात येत होत्या. उच्च न्यायालयाने दिलेले सर्व प्रकरणांचे निवाडे गोळा करणे हे कठीण काम असले तरी निरनिराळ्या ५ प्रकरणांचे निकाल संदर्भ दोनवर नमूद केलेल्या निवेदनासोबत परिशिष्ट १ ते ५ म्हणून सोबत जोडून हे निवेदन, मा. प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांना सादर करण्यात आलेले होते. ते निवेदन सर्व सहपत्रासह मिळाल्याचे शासनाने सभागृहात मान्य केलेले आहे.

२. निवेदनासोबतचे **सहपत्र एक** म्हणजे Manohar Rangrao Thakare, Aged about 42 years, resident of Shivaji Nagar, Nerparsopant, Distt. Yavatmal ... Petitioner ***Versus*** The State of Maharashtra, through its Secretary, Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai या प्रकरणात Writ Petition No. 2410 of 2003 मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती A.P.Deshpande and K.J.Rohee JJ यांच्या खंडपीठाने दिनांक २ सप्टेंबर २००४ रोजीच्या दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत होय. या निर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये असे नमूद केलेले आहे की "under the Government Resolution dated 25.1.1990, the State Government has to approve the dereservation of the post, if the post could not be filled in by appointing a reserve category candidate for a period of five years and in case of the petitioner, there is no specific order of dereservation of the post. No one has disputed the entitlement of the petitioner to be regularised in the post in the sixth year, as provided in the Govt. Resolution dated 25.1.1990" व शेवटी परिच्छेद ४ मध्ये मा. खंडपीठाने असा निर्णय दिलेला आहे की, "We direct respondent no.6 College to submit a proposal for dereservation of the post from the sixth year to the University and the University is directed to make appropriate recommendation to the State Government, within two weeks from the date of receipt of the proposal from respondent no. 6 College and **the State Government in turn is directed to issue necessary orders in regard to dereservation of the post held by the petitioner and for regularisation of the petitioner's services in the sixth respondent College, within a period of eight weeks from the date of receipt of the proposal from the University.**"

३. निवेदनासोबतचे **सहपत्र दोन** म्हणजे Sanjay S/o Motiramji Kharbade, Aged about 42 years, Occ. Service, r/o Ramnagar, Bhandari Layout, Pusad, Dist. Yavatmal ... Petitioner ***Versus*** The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai या प्रकरणात Writ Petition No. 1085 of 2004 मध्ये उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती Shri. Justice V.C.Daga & Shri. Justice S.U.Kamdar, JJ यांच्या खंडपीठाने दिनांक ११ ऑक्टोबर २००४ रोजी दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत होय. या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये असे नमूद केलेले आहे की "On receipt of the fresh proposal, **the State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 10.10.1990 with all consequential benefits, within 4 weeks.**"

४. निवेदनासोबतचे **सहपत्र तीन** म्हणजे Vinod s/o Lahurao Khalatkar, aged about 40 years, occupation : Service, r/o Gurudeo Nagar, Digras, Dist. Yavatmal ... Petitioner ***Versus*** The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai या प्रकरणात Writ Petition No. 1121 of 2004 मध्ये उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती P.S.Brahme and B.R.Gavai JJ यांच्या खंडपीठाने दिनांक ९ फेब्रुवारी २००५ रोजी दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत होय. या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये असे नमूद केलेले आहे की "The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State to dereserve the post in the event the, candidate from the reserved category is not available for a period of five years." व शेवटी त्याच परिच्छेदात मा. खंडपीठाने असा निर्णय दिलेला आहे की, "**We therefore direct** respondent no. 3 to send a fresh proposal for dereservation of the post which is occupied by petitioner to respondent no. 1. On receipt of fresh proposal the respondent no.1 **State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 6.2.1990 with all consequential benefits within four weeks from the receipt of the proposal. The rule is made absolute in the aforesaid terms.**"

५. निवेदनासोबतचे **सहपत्र चार** म्हणजे Vivek s/o Haribhau Hiware, aged about 41 years occupation : Service, r/o Ojwal Nagar, Daryapur Road, Akot Dist. Akola ... Petitioner ***Versus*** The State of Maharashtra, through Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai या प्रकरणात Writ Petition No. 1112 of 2004 मध्ये उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती P.S.Brahme and B.R.Gavai JJ यांच्या खंडपीठाने दिनांक ९ फेब्रुवारी २००५ रोजी दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत होय. या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये असे नमूद केलेले आहे की "The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State to dereserve the post in the event, the candidate from the reserved category is not available for a period of five years. it is specifically laid down in the said Government Resolution that if the candidate for reserved category is not available for a period of 5 years then the post should be dereserved from the 6th year." व शेवटी परिच्छेद ४ मध्ये मा. खंडपीठाने असा निर्णय दिलेला आहे की, "**We therefore direct** respondent no. 3 to send a fresh proposal for dereservation of the post which is occupied by petitioner to respondent no. 1. On receipt of fresh proposal the respondent no.1. **State shall take action of dereservation of the post occupied by the petitioner from 6.9.1990 with all consequential benefits within four weeks from the receipt of the proposal. The rule is made absolute in the aforesaid terms.**"

६. निवेदनासोबतचे **सहपत्र पाच** म्हणजे Kiran s/o Shankarrao Khandare, aged about 36 yrs., occ. : Service, r/o P-40, c\o Adv. Jahagirdar, Mahasul Colony, Near Sapkal Hospital, Akola ... Petitioner ***Versus*** The State of Maharashtra, through Secretary, Higher Education De-

partment, Mantralaya, Mumbai या प्रकरणात Writ Petition No. 2651 of 2004 मध्ये उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्ती P.S.Brahme and B.R.Gavai JJ यांच्या खंडपीठाने दिनांक २ मार्च २००५ रोजीच्या दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत होय. या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये असे नमूद केलेले आहे की "The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State to dereserve the post in the event the, candidate from the reserved category is not available for a period of five years. It is specifically laid down in the said Government Resolution that if the candidate for reserved category is not available for a period of 5 years then the post should be dereserved from the Sixth year." व शेवटी परिच्छेद ४ मध्ये मा. खंडपीठाने असा निर्णय दिलेला आहे की, "**We therefore direct** respondent no. 3 to send a fresh proposal for dereservation of the post which is occupied by petitioner to respondent no. 1. **Respondent no.1, on receipt of fresh proposal, shall take action of dereservation of the post from 28.8.1991 with all consequential benefits within four weeks from the receipt of the proposal.**"

७. उपरोक्त सारख्या प्रकरणामध्ये पदे अनारक्षित करतांना **२५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय लागू पडतो की ५ डिसेंबर १९९४ चा शासननिर्णय लागू पडतो? याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी सन २००१ च्या याचिका क्रमांक ३३०५ मध्ये तपशिलवार उहापोह केला असून त्यानंतर त्यावर 'निकाल' दिला आहे. (यानंतर उल्लेख निकाल असा)**

७.१ शासनाच्या वकीलाचे काय म्हणणे आहे हे मा. न्यायालयाने केवळ ऐकून घेतले असेच नव्हे तर त्याची आपल्या निकालामध्ये तपशिलवार नोंद केली आहे. या निकालाचा परिच्छेद ४ पुढील प्रमाणे आहे. :-

"Shri.Patel, learned Assistant Government pleader for the respondent nos. 1 and 2, **does not dispute** that as per clause (2) of the Government Resolution dated 25.1.1990 the post reserved for candidate belonging to reserved catogory, should be reserved for five years and in the sixth year, same needs to be dereserved if the candidate form the reserved category is not available. **It is also not disputed** that the post in question was reserved for candidate belonging to scheduled Tribe for six years, i.e.more that five years. However, as per Government Resolution dated 9.12.1994, post should be reserved for five recruitment years and efforts should be made in the sixth recruitment year for filling the post by candidate from other category by exchange and in the seventh recruitment year, proposal for dereservation of post should be sent to the Government. It is submitted that this procedure has not been followed by the respondent college as well as University and therefore, proposal forwarded by the University for dereservation of the post in question is rejected by the State Government by the impugned communication.."

७.२ अशा प्रकरणामध्ये ५.१२.१९९४ चा शासन निर्णय लागू पडत नसून २५ जानेवारी १९९० चा शासननिर्णय लागू पडतो, हे विद्यापीठाच्या वकिलाचे म्हणणे मा. उच्च न्यायालयाने ऐकून घेतले व निकालामध्ये त्यांची नोंद केली. निकालाचा परिच्छेद ५ पुढील प्रमाणे :-

"Shri. Kasat, Learned counsel for the respondent no.3 University, States that post in question was reserved for six years and in view of Government Resolution dated 25.1.1990, it can now be dereserved and, therefore, state Government ought to have granted permission for the same. It is contended that so far Government Resolution dated 5.12.1994 is concerned, same has come into force with effect from 1.1.1995 and therefore, provisions of the said Government Resolution are not attracted in the case of the petitioner. "

७.३ अशा प्रकरणामध्ये १९९४ चा शासननिर्णय लागू होतो की

(६)

## अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००६ : शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २००६*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत बाब क्रमांक पाच (ब) लक्षवेधी सुचनेवरील जोडपत्राच्या १२ व्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना*

**प्रा.बी.टी. देशमुख, श्री.व्हि.यु. डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल. ऐनापूरे,** यांनी विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली सूचना (लक्षवेधी सूचना) पुढील प्रमाणे आहे.:-

विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव ५ डिसेंबर, १९९४ च्या शासननिर्णयातील अटीनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कारवाई करणे शक्य झाले नाही, असे १८ एप्रिल, २००६ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ च्या लेखी उत्तरात शासनाने नमूद करणे, शासनाच्या वतीने असाच युक्तिवाद मा. उच्च न्यायालयासमोर करण्यात आला असता **१९९४ चा शासननिर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही** (Cannot be appllied retrospectively) **असा स्पष्ट निर्णय ६ फेब्रुवारी, २००४ रोजी २००१ च्या याचिका क्र. ३३०५ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने देणे,** एकदा मा. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावल्यामुळे पुढच्या अनेक याचिकांमध्ये शासनातर्फे असा युक्तिवाद केला न जाणे, त्यामुळे अनेक याचिकांमध्ये निर्णय देताना (उदा. २ सप्टेंबर रोजी निर्णय झालेली २००३ ची याचिका क्रमांक २४१०) "**२५ जानेवारी १९९० च्या शासननिर्णयानुसार यांना संरक्षण द्यायचे आहे याबद्दल आमच्यासमोर कोणीही वाद घातलेली नाही**" असे मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयातच नमूद करणे, १९९४ चा निर्णय या प्रकरणी लागू करण्याची कृती न्यायालयाचा अवमान करणारी आहे, याची जाणीव असतांना वारंवार तशी भूमिका घेतल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची अशी अवमानना करण्यास कोण जबाबदार आहे हे निश्चित करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, मा. सभापतींच्या दालनात २७ एप्रिल, २००६ रोजी झालेल्या बैठकीत मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे उच्च शिक्षण विभागाने मान्य करुन सुध्दा त्याबाबत कोणतीही कारवाई न होणे, परिणामी संबंधित शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत दाखल झालेल्या **याचिकांच्या अनुषंगाने** तसेच याबाबत विधानमंडळात झालेल्या **चर्चेच्या अनुषंगाने** तसेच, उपरोक्त **प्रकरणांच्या अनुषंगाने** दि. २७.४.२००६ रोजी मा. सभापती यांच्या दालनात झालेल्या **बैठकीच्या अनुषंगाने** अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत कार्यवाही करताना संचालक, उच्च शिक्षण तसेच अमरावती विद्यापीठाने, **अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे सुधारित बिंदूनामावलीनुसार बिनराखीव असल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही करावयाची नाही व तसे विद्यापीठास कळविण्यात आले आहे.**

*****

***नोट*** *:- मा. सभापतींनी मान्य केलेल्या व सभागृहामध्ये प्रत्यक्षात चर्चेला न येवू शकलेल्या सर्व लक्षवेधी सूचनेवरील शासनाची निवेदने त्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात व त्या दिवशीच्या कामकाजात ती नोंदविली जातात. पण शेवटच्या दिवशी अनेक विभागाकडून निवेदने येत नाहीत. अशा वेळी मान्य करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेची यादी समाविष्ट असलेले जोडपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. प्रत्यक्ष निवेदने नंतर म्हणजे २-४ दिवसांनी, कधी कधी तर बऱ्याच नंतर पाठविली जातात. उपरोक्त निवेदन २१ जुलै २००६ च्या कामकाजात नोंदविले जाईल. निवेदनातील प्रत्यक्ष मजकूर पाहिला तर हे निवेदन ४ नोव्हेंबर २००६ नंतर तयार झालेले दिसून येते. प्रत्यक्ष आम्हाला ते नागपूर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मिळाले.* - ***बी.टी.देशमुख, विधानपरिषद सदस्य***

१९९० चा शासननिर्णय लागू होतो? याबाबत परस्परविरोधी बाजूचे मत आम्ही विचारात घेतले, असे नमूद करुन मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालाच्या परिच्छेद ७ मध्ये असे नमूद केले आहे की :-

**"On the backdrop of the above referred undisputed facts, it is apparent that provisions of Government Resolution dated 5.12.1994 are prospective in nature and cannot be applied retrospectively"**

मा. उच्च न्यायालयाने (Writ Petition No. 3305 of 2001) मध्ये दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी हा निकाल दिलेला असून संदर्भ २ वरील निवेदन कर्त्यांनी निवेदनासोबत जोडलेले पाचही निकाल हे त्यानंतरचे म्हणजे २ सप्टेंबर २००४, ११ ऑक्टोबर २००४ व फेब्रुवारी- मार्च २००५ मधील आहेत.

८. संदर्भ २ वर नमूद केलेले निवेदन, निवेदनकर्त्यांनी प्रधान सचिवांना पाठविल्यानंतर याबाबतचा आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ५६०३ हा दिनांक २९ जुलै २००५ च्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. अधिवेशन लवकर संपल्यामुळे ती यादी २३ जुलै २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. "अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरही अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केले हे खरे आहे काय," या आमच्या प्रश्न भाग १ ला, मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी "**मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्याबाबत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे निवेदन प्राप्त करुन घेण्यात आले आहे.**" असे उत्तर दिले होते. "निवेदन प्राप्त करुन घेण्यात आले आहे" हा उत्तरातील भाग चिंतनीय म्हटला पाहिजे. ३० मे २००५ रोजी दिलेले निवेदन सहसंचालकांनी जुलैपर्यंत शासनाकडे का पाठविले नाही? व **प्रश्न लागल्यावर ते निवेदन प्राप्त करुन घ्यावे लागले. ही दुर्दैवाची व चिंतेचीच बाब म्हटली पाहिजे.**

### *संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ*

क्र. संगाबाअवि/८/सी-१९३४/२००६ : दिनांक : ४.१२.२००६

प्रति,
प्राचार्य,
बा.बु.कला वा.भ.वाणिज्य, ब.वा.पा.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस जि. यवतमाळ [1]

**विषय** : अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करणेबाबत शासनास पाठविलेल्या प्रस्तावासंबंधी

**संदर्भ** :- शासन पत्र क्र. एनयुसी-२००६/(१०५/०६) मशि-६ दिनांक ०४.११.२००६

२. शिक्षण संचालकांचे पत्र क्र. एनजीसी/लवेसु/२००६/अवि/मवि-३/५६५ दि. १७.११.२००६

महोदय,

अमरावती विद्यापीठामार्फत संलग्नित महाविद्यालयातील राखीव पदे बिनराखीव करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेले होते. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयातील राखीव जागेवर नियुक्त करण्यात आलेले इंग्रजी या विषयाचे अधिव्याख्याता श्री. व्ही.एल. खडतकर[2] यांचे पद बिनराखीव करणेबाबतचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्तावही पाठविण्यात आलेला होता. सदरची सर्व पदे बिनराखीव करण्यासाठी शासनाकडे सतत पाठपूरावाही करण्यात आलेला होता.

परंतु सदरची पदे बिनराखीव करण्याबाबतची कार्यवाही अद्यापपावेतो झालेली नसल्याने शासनाने बिंदुनामावलीनुसार संबंधित शिक्षकांच्या नावासमोर आरक्षण धोरणानुसार कशाची नोंद आहे याबाबतची विद्यापीठ कार्यालयाला विचारणी केली होती. त्यानुसार विद्यापीठाद्वारा शासनास सदरची माहिती तात्काळ फॅक्सद्वारे पुरविण्यात आली होती. त्यानंतर सदर प्रस्तावाचे संदर्भात श्री. रा.चो. सरवदे, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. एनयुजी-२००६/(१०५/०६) मशि-६ दि. ०४.११.२००६ विद्यापीठास प्राप्त झालेले आहे. हे पत्र आपल्या माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

आदेशान्वये

आपला विश्वासू,
(डॉ. अ.धों. चव्हाण)
सहा. कुलसचिव (म.वि.) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

*१ व २ :- रिकाम्या जागेत महाविद्यालयाचे व शिक्षकाचे नाव*

९. सदरहू विषयावरील लक्षवेधी सूचनेवर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी केलेले निवेदन २३ जुलै २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. या निवेदनातील पुढील मजकूर पहा :-

"**मा. खंडपीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा सुधारित परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावयाचा असून शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावयाची आहे.** त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दि. ५.१२.९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही. या परिस्थितीत, सुधारित परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्याबाबत विद्यापीठांना कळविले आहे." विशेषतः ५.१२.१९९४ च्या शासननिर्णयाविषयीचा त्यातील भाग निश्चितच आक्षेपार्ह व न्यायालयाचा अवमान करणारा आहे. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या या निवेदनांचा शेवट पुढील शब्दात आहे.:- "पदे अनारक्षित करण्याबाबत नागपूर व अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयाचे **विद्यापीठाने पाठविलेले प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यावर उपरोक्त शासन निर्णय दि. ५.१२.९४ नुसार कार्यवाही करता आलेली नाही.**"

**१०.** मंगळवार , दिनांक ६ डिसेंबर २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील प्रश्न क्रमांक ९२९१ ला दिलेले उत्तरसुद्धा पहाण्यासारखे आहे. "एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दि. ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या आमच्या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी 'होय' असे उत्तर दिले होते. "असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग २ व ३ च्या उत्तरात त्यांनी "मा. उच्च न्यायालयाने संबंधित महाविद्यालयांनी/विद्यापीठांनी पद आरक्षित करण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत व शासनाने त्यावर कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत, **त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने फेरप्रस्ताव मागितला आहे.**" असे नमूद केले होते.

**११.** सन २००५ मध्ये वारंवार हा प्रश्न सभागृहात आला असतांना जानेवारी २००६ मध्ये एक विक्षिप्तपणाची कारवाई मंत्रालयातून करण्यात आली. १९ जानेवारी २००६ रोजी श्री. मा.के.केंद्रे या नावाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी एक पत्र पाठवून (क्रमांक एयुसी २००४/(८१/०४)/मशि-५) "आपण ५.१२.९४ चा शासननिर्णय विचारात घेणे आवश्यक असतांना फक्त शासननिर्णय २०.१.१९९० विचारात घेतलेला दिसून येतो." असे विद्यापीठाला कळविले. **१९९४ चा शासननिर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाही. याप्रकरणी १९९० चा शासननिर्णय लागू होतो असे एकामागून एक अनेक निर्णय मा. उच्च न्यायालयाने दिलेले असतांना** "या प्रकरणी १९९४ चाच शासननिर्णय लागू होतो" असा आदेश काढण्याचा अधिकार या देशाच्या घटनेप्रमाणे फक्त मा. सर्वोच्च न्यायालयाला आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाचे हे अधिकार मंत्रालयातील केंद्रे या नावाच्या कक्ष अधिकाऱ्याला अजून तरी बहाल झालेले नाहीत.** हेही नमुद केले पाहिजे की एकट्या केंद्रे या अधिकाऱ्याला दोष देण्याचा हा विषय नाही.

**१२.** लेखी उत्तरे येत आहेत. सभागृहाच्या पटलावर ठेवली जात आहेत. सभागृहात चर्चा होण्यासारखी परिस्थिती नाही, ही गोष्ट वेगळी. मात्र सभागृहात प्रश्नावर चर्चा होण्याची शक्यता असेल तर तो प्रश्न वेगळा असतो व गांभिर्याने घेण्याचा असतो. मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००६ रोजी प्रश्न क्रमांक १२७४२ हा तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये पहिल्याच क्रमांकावर होता. "एकामागून एक अशा अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधीन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय," या प्रश्न भाग १ ला मा. मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले होते व "झालेला असलयास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय

आहे व ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे ?" या प्रश्न भाग २ व ३ ला त्यांनी एकत्रितरित्या "मा. उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावा व शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावी, **परंतु विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक ५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.**" असे उत्तर दिले होते.

**१३.** दिनांक १८ एप्रिल २००६ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १२७४२ वर झालेल्या अनुपूरक चर्चेमध्ये आम्ही मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील उतारे वाचून दाखविले. १९९० चा शासननिर्णय लागू होतो की १९९४ चा? हा आता वादाचा विषय राहीलेला नाही, हे सांगून पाहिले. मा. मंत्रिमहोदय पुन्हा पुन्हा १९९४ च्या शासननिर्णयाचा आग्रह धरत होते. ही चर्चा पहा :-

"**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती मी सांगत होतो.. मुळात एखादा आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद कसे भरावयाचे या संदर्भातील हा विषय आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य २५ जानेवारी १९९० च्या जी.आर. चा संदर्भ सांगत आहेत. त्यासाठी तुम्ही कोर्टाच्या जज्जमेंटची प्रत आणली आहे, ती प्रत माझ्याकडेही आहे. **१९९० चा जी.आर. कोर्टमध्ये प्रोडयूस करण्यात आला व त्या आधारावर कोर्टाने निर्णय दिला. त्याच्यापुढे काही गोष्टी आहेत...**

(माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख बसून बोलतात.) (अडथळा)

सभापती महोदय, माननीय सदस्यांचे एकदा विचारुन पूर्ण झाल्यानंतर मी उत्तर देतो...

**सभापती :** माननीय सदस्यांनी माननीय मंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. आपल्याला जर शंका असेल तर मी पुन्हा आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

**श्री. दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, २५ जानेवारीच्या जी.आर. मध्ये ५ वर्षापर्यंत हे पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी जर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ती जागा बीनराखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराला कायम करावे अशाप्रकारचा जी.आर. आहे. त्या आधारे कोर्टामध्ये रिलिफ मागितले आहे. १९९१ मध्ये या संदर्भातील आणखी एक जी.आर. काढला गेला, १९९४ मध्ये आणखी एक जी.आर. काढला गेला. **दुर्दैवाने हा जी. आर. कोर्टामध्ये दाखविला गेला नाही.** एखादे आरक्षित असलेले पद डिरिझर्व्ह ठेवायचे असते त्यावेळी त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून आल्यानंतर तो प्रस्ताव सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण विभाग या दोन्ही विभागाकडे जातो व नंतर मुख्य सचिवांकडे जाऊन वरच्या पातळीवर त्या संदर्भात निर्णय होत असतो. बऱ्याच केसेसमध्ये असे आढळून आलेले आहे की, राखीव कॅटेगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही व तो उमेदवार उपलब्ध होतोच असे नाही, त्या जागेवर ज्यांचे पोस्टींग केले जाते, ते उमेदवार तात्पुरत्या स्वरुपामध्ये असतात तरी देखील त्यांना प्रमोशन दिले जाते. तो त्या ठिकाणी पाच-सहा वर्षे काम करीत आहे, असे म्हटल्यानंतर डी-रिझर्व्हेशन करुन, त्याला कायम स्वरुपामध्ये नेमणूक द्याव्यात अशाप्रकारची भूमिका आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** तसे कोर्टाचे आदेश आहेत."

तसे कोर्टाचे आदेश आहेत असे सांगितल्यानंतरसुद्धा मा. मंत्रिमहोदयांनी पुढीलप्रमाणे माहीती सभागृहाला दिली :-

"अशाप्रकारच्या केसेस सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविल्या जातात. त्यावेळेला १९९० च्या जी.आर.चा आधार घ्यायचा? की १९९४ च्या जी.आर.चा घ्यायचा? किंवा २००५ सालच्या जी.आर.चा आधार घेऊन कारवाई करावयाची या संदर्भामध्ये निश्चित प्रकारे निर्णय घेण्यासाठी, काही कालावधी लागणार आहे. या संदर्भात सरकारला अधिक वेळ लागणार आहे."

**हायकोर्टाने चार आठवड्यात शासननिर्णय काढा असे आदेश दिल्यानंतर १२ महिन्याने, सामान्य प्रशासन विभाग, १९९० चा शासन निर्णय की १९९४ चा शासननिर्णय? की २००५ (मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर निघालेला) चा शासननिर्णय? निश्चित प्रकारचा निर्णय घेणे, त्यासाठी कालावधी लागणार आहे, सरकारला अधिक वेळ लागणार आहे, हे सर्व ऐकणे केविलवाणे वाटत होते.**

**१४.** हायकोर्टाच्या अनेक निर्णयाबाबतचा अनादर असा सभागृहामध्ये व्यक्त केल्या जात असतांना आपण सभापती या नात्याने चर्चेत हस्तक्षेप करुन पुढील प्रमाणे निर्णय दिला. :-

"**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा. मी यासंदर्भात असे करतो की, सन्माननीय मंत्रिमहोदय तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि इतर अन्य सन्माननीय सदस्य असतील त्यांची २० तारखेला बैठक बोलावतो."

**१५.** मा. सभापतीमहोदय! आपण यासंदर्भात बोलाविलेली बैठक दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी आपल्या विधानभवनातील दालनामध्ये पार पडली. सभागृहामध्ये फक्त मंत्रिमहोदयच उत्तर देत असतात, अशा बैठकीमध्ये विभागाच्या सचिवांनी व अधिकाऱ्यांनी प्रश्नोक्त विषयाची किती तयारी केलेली आहे हे उघड होते. हायकोर्टाच्या निर्णयामध्ये १९९० च्या शासननिर्णयाप्रमाणे कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश असतांना वेगळी कारवाई करणे बरोबर नाही, असे मी वारंवार सांगत असतांना प्रधान सचिवांनी काढलेले उद्गार व त्यावर आपण दिलेली समज कार्यवृत्ताच्या पृष्ठ अे-२ वर नोंदलेली आहे. ती पुढील शब्दात :-

"**श्रीमती शंकरन :** यासंबंधी जे काही करावयाचे असेल ते सामान्य प्रशासन विभागाला करावे लागणार आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ज्यावेळी हायकोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल झाले, त्यावेळी विभागाला आपले म्हणणे मांडण्यासाठी हायकोर्टाने बोलावले होते. त्यावेळी विभागाने त्यांच्या अंतर्गत सर्व फॉर्मालिटीज विचारात घेऊन आपले म्हणणे कोर्टापुढे सादर केले असते तर ते सरकारचे मत झाले असते."

**"जे काय करावयाचे असेल ते सामान्य प्रशासन विभागाला करावे लागणार आहे." हे जर खरे असेल, तर आपण या बैठकीसाठी कशा काय आलात? असा प्रश्न मनात येवून सुद्धा विचारणे मला योग्य वाटले नाही व त्यामुळे मी तो विचारला नाही, हे कार्यवृत्तावरुन दिसून येईल.**

**१६.** मा. सभापतींच्या दालनात झालेल्या या बैठकीमध्ये "सामान्य प्रशासन विभागाने सन १९९४ मध्ये जी.आर. काढल्यामुळे आधीचा जी.आर. आपोआपच सुपरसिड होतो." असे एकदा सचिवांनी सांगितले. **आमची बाजू न्यायालयात मांडलीच गेली नाही**, असेही त्या वारंवार सांगत होत्या, सुरुवातीच्या प्रकरणात सरकारी वकिल हजर होते. १९९० चा जी.आर.लागू पडतो की १९९४ चा याबाबत तेथे वाद झाला व त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचा निर्णय झाला हे मी सांगितल्यावर या बैठकीत झालेली चर्चा पृष्ठ सी १ वर नमुद आहे. ती पुढील प्रमाणे :-

"**सभापती :** या केसमध्ये जर सरकारने ॲफिडेव्हीट केले असते व वकीलांना ब्रिफ केले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता.

**श्रीमती शंकरन :** परंतु तसे घडलेले नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख :** जज्जमेंटमध्ये काय म्हटलेले आहे ते मी आपणाला वाचून दाखवितो. "No one has disputed the entitlement of the petititioner to be regularised for the post in the 6th year as provided in the Government Resolution dated 25.1.1990."

**श्रीमती शंकरन :** डीरिझर्वेशनच्या बाबतीत जे नियम आहेत, ते स्ट्रीक्टली फॉलो केले पाहिजेत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** स्ट्रीक्टली फॉलो केले पाहिजेत हे आपले म्हणणे बरोबर आहे, परंतु वस्तुतः तसे होत नाही. श्री. केंद्रे यांनी मंत्रालयातून असे पत्र पाठवावयास नको होते. That does not allow somebody to sit in the Mantralaya and act as a Supreme Court. ते अशोभनीय आहे. त्यांनी आपल्या मर्यादा ओळखावयास पाहिजे. श्री. केंद्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तसे ब्रिफ केले. या प्रकरणामध्ये सन १९९० चा शासननिर्णय लागू होतो, माननीय हायकोर्टाच्या जज्जमेंटमध्ये हे आल्यानंतर सुद्धा श्री. केंद्रे यांनी १९९० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता १९९४ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करा असे पत्र पाठविणे योग्य नाही.

**श्रीमती शंकरन :** आम्ही हे प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करू."

मा. उच्च न्यायालयात प्रकरण गेल्यावर जे काय मांडायचे ते तेथे मांडले पाहिजे. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यावर जे मांडायचे राहून गेले आहे ते सभागृहात किंवा मा. सभापतींनी बोलाविलेल्या बैठकीत मांडणे योग्य नाही. हा विचार "या केसमध्ये सरकारने ॲफिडेव्हिट केले असते व वकिलांना ब्रिफ केले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता." अशा भारदस्त शब्दात मा. सभापतींनी मांडल्यावर सचिवांनी धाडकन "परंतु तसे घडलेले नाही" असे उद्गार काढले. **हे उद्गार संपूर्णपणे असत्य आहेत, कारण हायकोर्टात ती बाजू मांडली गेली व कोर्टाने ती फेटाळून लावली हे वर आलेलेच आहे. सचिवांचे म्हणणे सत्य आहे असे मानले तरी हायकोर्टात शासनाची बाजू मांडण्याचे काम त्या शिक्षकांचे आहे? की विधानपरिषद सदस्यांचे आहे? का मा. सभापतींचे आहे? असा प्रश्न मनात येवून सुद्धा विचारणे मला योग्य वाटले नाही व त्यामुळे मी तो विचारला नाही. हे कार्यवृत्तावरून दिसून येईल.**

**१७.** ही सारी चर्चा सुरू असतांना सर्वांचे म्हणणे ऐकल्यावर मा. सभापतींनी त्यावर अतिशय स्पष्टपणे हायकोर्टाचा निर्णय झाला आहे.

सरकार सुप्रिम कोर्टात गेले नाही. त्यामुळे हायकोर्टाचा निर्णय इनटॅक्ट आहे असे उद्गार काढले. मा. सभापतींच्या उद्गारानंतर मी पुन्हा उच्च न्यायालयाच्या निर्णयातील ऑपरेटिव्ह पार्ट वाचून दाखविला. हा निर्णय कोणत्या तारखेचा आहे याची मंत्रिमहोदयांनी विचारणा केली तर त्यावर अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली. पहिला निर्णय ४ सप्टेबर २००४ चा आहे हे ऐकल्यावर, त्यावर विभागाने काय कारवाई केली? असे मंत्रिमहोदयांनी विचारले. तर त्यावर "विविध विभागांचे अभिप्राय घेण्याचे काम चालू आहे" असे उत्तर सचिवांनी दिले. ही पृष्ठ डी-२ वरील चर्चा पुढील प्रमाणे :-

"**सभापती :** परंतु या प्रकरणी हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर सरकार सुप्रिम कोर्टात गेलेले नाही. तसे न झाल्यामुळे हायकोर्टाचा जो निर्णय आहे तो इंनटॅक्ट आहे..

**प्रा.बी.टी.देशमुख :** विभागाचा हट्टच असेल तर तुम्ही सुप्रिम कोर्टात जाऊ शकता. अन्यथा सुप्रिम कोर्टात जाण्याची आवश्यकता नाही. हायकोर्टाची अशी ऑर्डर आहे की, " The State Government in turn is directed to issue necessary orders in regard to the dereservation of the post held by the petitioner ...."

**श्री.दिलीप वळसे पाटील :** हायकोर्टाचा निर्णय किती तारखेचा आहे? व विभागाने त्याबाबत कोणती कार्यवाही केली?

**श्री. उसारे :** हायकोर्टाचा निर्णय २ मार्च २००५ रोजीचा आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** विभागाने दिलेली माहिती बरोबर नाही. हायकोर्टाने दि. ४ सप्टेबर, २००४, ११ ऑक्टोबर २००४, १५ फेब्रुवारी २००५ व २ मार्च २००५ रोजी निर्णय दिलेले आहेत.

**श्री. दिलीप वळसे पाटील :** या निर्णयाच्या आधारे विभागाने कोणती कार्यवाही केली आहे?

**श्रीमती शंकरन :** विविध विभागांचे अभिप्राय घेण्याचे काम चालू आहे."

**"चार आठवड्याच्या आत शासनाने याबाबतचा शासननिर्णय काढावा" असे मा. उच्च न्यायालयाचे १८ महिन्यापूर्वीचे आदेश असतांना अजूनही विविध विभागांचे अभिप्राय घेण्याचे काम मा. सचिव सुरुच ठेवणार असतील तर आणखी निदान २-४ वर्षे तरी हे काम चालेल ना? असा प्रश्न मनात येवून सुद्धा विचारणे योग्य न वाटल्यामुळे मी तो विचारला नाही, हे कार्यवृत्तावरून दिसून येईल.**

१८. हा प्रश्न पुन्हा गुरुवार, दिनांक ६ जुलै २००६ रोजी सभागृहात उत्तरासाठी होता व त्यावर बरीच अनुपुरक चर्चा झाली. "याबाबतीत राज्यसरकार तीन महिन्यामध्ये अंतिम निर्णय घेईल" असे उत्तर मा. मंत्रिमहोदयांनी दिले. खरे म्हणजे जुलै २००६ मध्ये पुन्हा ३ महिन्याचा अवधी मागण्याचे काहीही कारण नव्हते. पण "हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे ३ महिन्यात निर्णय घेणार काय?" या प्रश्नालासुद्धा "३ महिन्यात यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल" असे उत्तर ते देत होते. सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी व मी स्वतः हायकोर्टाच्या निर्णयाची अशी तुम्हाला अवहेलना करता येणार नाही असे सांगत असतांना मा. सभापतींनी सुद्धा चर्चेत सहभाग दिला. ती चर्चा पुढील प्रमाणे :-

"**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर गरज असेल तर सुप्रिम कोर्टामध्ये अपील दाखल करावयास हवे. अन्यथा हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास हवी. कारण, हायकोर्टाचा निर्णय जीवंत आहे. त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारवर बंधनकारक आहे. नाही तर कन्टेम्ट ऑफ कोर्ट होऊ शकतो. हायकोर्टाच्या निर्णयाच्या आधारे परिपत्रक काढणे हे खरे कायदेशीर आहे. त्यामुळे सभागृहात अशा प्रकारची चर्चा आपण होऊ देता कामा नये. त्यांना जर हायकोर्टाचा निर्णय मान्य नसेल तर त्यांनी सुप्रिम कोर्टात जावे. परंतु, सुप्रिम कोर्टात न जाता हायकोर्टाची अंमलबजावणी न करणे हे बेकायदेशीर आहे आणि म्हणून आपले संरक्षण आम्हाला हवे आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** देशाच्या घटनेप्रमाणे हायकोर्टाने दिलेल्या निर्णयावर या ठिकाणी चर्चा करता येत नाही. 'केंद्रे' नावाच्या कक्ष अधिकाऱ्याने हायकोर्टाच्या निर्णयाविरोधी परिपत्रक काढलेले आहे, जो त्यांचा अधिकार नाही. एकदा हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रीमहोदय जी सामान्य प्रशासन विभाग वगैरे प्रोसिजर सांगत आहेत, त्याचे कौतुक करता येणार नाही. म्हणून आपण याबाबत ठामपणे सांगितले पाहिजे की, हायकोर्टाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी झाली पाहिजे. एकदा तुमचे म्हणणे हायकोर्टात अमान्य झाल्यानंतर, हायकोर्टाने अर्धा डझन प्रकरणी एकसारखे निर्णय दिल्यानंतर, केंद्रेंसारख्या अधिकाऱ्याने हायकोर्टाच्या निर्णयाविरोधी परिपत्रक काढले आहे. त्यामुळे या सभागृहाची प्रतिष्ठा बाधित होते. त्यामुळे सभापती महोदय, आपण या प्रश्नावर मागच्या वेळी आपल्या दालनामध्ये बेठक बोलावली होती.

**सभापती :** सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी त्यांच्या विवेचनावरुन सप्लिमेंटरी माहिती, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, या ठिकाणी दिली आहे. **त्यांचे जे मत आहे तेच माझेही मत आहे. एकदा हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते, हे गृहीत असते आणि तो निर्णय स्वीकारणे गरजेचे आहे.** या अनुषंगाने शासनाला काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे. **माझ्या दालनामध्ये २७ एप्रिल २००६ रोजी सविस्तर चर्चा झाली त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे, असे मी बोललो होतो.**

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे बोलणे Contempt of court आहे."

मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची, सभागृहाची व सभापतिपदाची प्रतिष्ठा ठेवणाऱ्या मा. सभापतींच्या उपरोक्त भारदस्त हस्तक्षेपानंतरसुद्धा मा. उच्च शिक्षणमंत्री "लिगल ओपिनियन" घेण्याची गोष्ट बोलत होते.

१९. एका वर्षापेक्षा जास्त काळ होऊन गेल्यानंतरसुद्धा "चार आठवड्यात शासन निर्णय निर्गमित करावा" या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची, वारंवार सभागृहात लक्षात आणून देऊनसुद्धा, अनेक प्रकरणात अंमलबजावणी होऊ नये, ही गोष्ट काय? किंवा मा. सभापतींनी आपल्या दालनात बैठक बोलावून जे सांगितले, खुद्द खुल्या सभागृहात जे उद्गार काढले, त्याकडे उच्च शिक्षण विभागाने कानाडोळा करावा, ही गोष्ट काय? उच्च शिक्षण विभागाची प्रतिष्ठा वाढविणारी नाही असे माझे मत आहे.

२०. उच्च शिक्षण विभागाने आणलेल्या सन २००६ चे वि.प.वि. क्रमांक १०, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहायित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक २००६ साठीच्या संयुक्त समितीचा मी सदस्य आहे. मुळात धोरण म्हणून अशा विद्यापीठांना माझा विरोध आहे. पण ते येणारच असेल तर त्यातील शक्य होईल तेवढे विष प्रयत्नपूर्वक कमी करावे, या भावनेने अगोदरच्या व आताच्या समितीवर सदस्य म्हणून काम करणे मी स्वीकारले होते. **उच्च शिक्षण विभागाने स्वीकारलेल्या उपरोक्त धोरणाचा निषेध म्हणून या समितीवर काम न करण्याचा मी निर्णय घेतला आहे. सोईचे व्हावे म्हणून दोन ओळीचे वेगळे राजीनामापत्र सोबत जोडले आहे. तसदीबद्दल क्षमस्व.**

आपला विनित,
**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

............................................

प्रति,
**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई

मा. महोदय,

सन २००६ चे वि.प.वि. क्रमांक १० यासाठी नेमलेल्या संयुक्त समितीचा सदस्य या नात्याने, मी त्या सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

०३.१०.२००६ आपला विनित
**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED at** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/ 2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **15.01.2007**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,........................................................